https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

दैनिक

# समर्थ राजयोग

SAMARTH RAJYOG

वैभव विवेक स्वामी
संपादक

राजमान्य, राजशक्ती

No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.

बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय दैनिक...

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ६ वे | अंक -१६८ | शनिवार दि.२१ फेब्रुवारी २०२६ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४


Beed | Daily Marathi | Year-6th | Issue-168 | Saturday, Dt.21 February 2026 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# परळीचे तहसीलदार मुंडे लाच प्रकरणी अटक

## ५० हजाराची लाच मागितली पण संशय आल्याने स्वीकारली नाही तरी सुद्धा धाडसी कारवाई

बीड /प्रतिनिधी

दि.११.०२.२०२६ रोजी लाप्रवि बीड येथे तक्रारदार यांनी परळी वै.येथे दि.११.०२.२०२६ रोजी तक्रार दिली की मला कोर्ट जामिनी करीता ७००००० लाख रूपायाची सॉलंसी ऐपतदार प्रमाणपत्र काढण्यासाठी तहसिलदार परळी यांचेकडे अर्ज केला असून त्यांनी मला सॉलंसी ऐपतदार प्रमाणपत्र देण्यासाठी ५०००० हजार रूपयाची मागणी करत आहेत. परंतु तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग बीड यांचे कडे परळी वै.येथे तक्रार दिली. तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीची पडताळणी तक्रारदार व पंच क्र.१ यांना तहसिल कार्यालय परळी वै. जि.बीड येथे पाठवुन लाच मागणी पडताळणी केली असता आलोसे श्री. मुंडे व तक्रारदार यांची तहसिल कार्यालय परळी वै.येथील



तहसिलदार यांचे कक्षात भेट झाली. भेटी दरम्यान कामासंदर्भाने चर्चा झाली त्यावेळी आलोसे मुंडे यांनी ५० अंक चिठठीवर असे लिहून ५००००/-मागणी केली.तक्रारदार म्हणाले कमी करा काही तुमच्या मनानी त्यावर त्यावर तडजोडी अंती चिठठीवर २५ आकडा लिहला असता तक्रारदार यांनी २०००० हजार रूपये देवू का असे म्हणाले तेव्हा लोकसेवक मुंडे यांनी आणखी तिन टाका असे म्हणून २३००० हजार रूपयाची लाचेची मागणी केली.त्यावेळी तक्रारदार यांनी २०००० हजार रूपये देतो असे म्हणाले असता लोकसेवक यांनी ठिकय पेडींग ठेवू नका असे म्हणुन २०००० हजार रूपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम २०,०००/- रुपये लागलीच स्विकारण्याचे मान्य केले.

दिनांक ११.०२.२०२६ रोजी लागलीस सापळा कारवाईचे आयोजन केले असता लोकसेवक मुंडे यांनी सदर रक्कम स्वीकारली नाही. गेले.दि.१६.०२.२०२६ रोजी सापळाचे आयोजन केले असता लोकसेवक श्री मुंडे यांनी लाज रक्कम स्वीकारले नाही. दि.१७.०२.२०२६ रोजी तक्रारदार व पंच यांचे सह सापळा कारवाई तहसिल कार्यालय परळी वै.येथे अजमावली असता लोकसेवक मुंडे व तक्रारदार यांची भेट झाली कामा संदर्भाने चर्चा झाली सॉलंसी झाली सकाळी त्यावर तक्रारदार यांनी मुंडे साहेब तुम्ही म्हणाल्याप्रमाणे ते पाकीट ..पाकीट देयचयं..कालबी आलतो..त्यावर लोकसेवक मुंडे यांनी काही न बोलता शासकीय वाहनाकडे निघुन गेले.

तक्रारदार व पंच यांच्या बद्दल संशय आल्याने लाच रक्कम स्विकारली नाही. मुळ तक्रारदार यांनी लोकसेवक मुंडे हे यापुढे माझे कडुन लाच रक्कम २०,०००/- रुपये

(उर्वरीत पान २ वर)

# पाटबंधारे विभाग लातूर क्रमांक १ येथील लिपिक कराड लाच स्वीकारताना अटक

लातूर प्रतिनिधी

पाटबंधारे विभाग लातूर येथील विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी येणारे कर्मचारी स्पर्धक यांना दिनांक १७-१- २०२६ ते दिनांक १९-१-२०२६ या काळात राहण्यासाठी अधिग्रहण करून दिलेले होते. सदर स्पर्धकांचे तीन दिवसाचे राहण्याचे बिल मिळणे बाबत तक्रारदार हे पाटबंधारे विभाग लातूर क्रमांक १ येथील कर्मचारी कराड यांना दिनांक १८ -२-२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे बिलाचा ३५, ८६०/- रुपयाचा चेक दिला व सदर चेक दिल्याचे बक्षीस म्हणून तक्रारदार यांना ७,०००/- रुपयांची लाच मागणी केली होती. त्यापैकी ५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना रंगेहाथ अटक करण्यात आली आहे.

दिनांक १८/०२/२०२६ रोजी पाटबंधारे विभाग लातूर क्रमांक १ येथील लिपिक कराड यांच्या कार्यालयात तक्रारदार यांचे कामासाठी लिपिक श्री कराड यांनी पंचासमक्ष ५,०००/- रू. लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.

दि. २०/०२/२०२६ रोजी १२.०५ वाजता सापळा कार्यवाही आजमावली असता लिपिक श्री शंकर कराड यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेली ५,०००/- रू लाच रक्कम पाटबंधारे विभाग लातूर क्रमांक १ येथे स्वतःचे कार्यालयात साहेबांना द्यायचे आहेत असे सांगून पंचासमक्ष १२.१५ वाजता स्वीकारली आहे. आरोपीची अंगझडती- लोकसेवक शंकर कराड यांचे अंगझडती मध्ये एक मोबाईल हँडसेट हस्तगत करण्यात आला असून आरोपी यांचे घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. याप्रकरणी गुन्हा रजि. नं., कलम, पो. स्टे., जिल्हाः - पो.स्टे विवेकानंद चौक लातूर जि. लातूर येथे कलम ७ भ्र.प्र.अधि. १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. आरोपीस ताब्यात घेण्यात आले असून, ५,०००/- रुपये लाचेची रक्कम आलोसे यांचेकडून हस्तगत करण्यात आली आहे.

सापळा अधिकारी संतोष धनसिंग बर्गे , पोलीस उपअधीक्षक,लाप्रवि., लातूर यांच्या नेतृत्वाखाली तपास अधिकारी विशाल बहात्तरे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि., लातूर यांनी ही कारवाई यशस्वी केली आहे.

# पेठ बीड पोलीसांनी मोबाईल व नगदी रक्कम हिसकावुन नेणारे २ आरोपी केले जेर बंद

बीड /प्रतिनिधी

दिनांक १९/०२/२०२६ रोजी फिर्यादी नामे अमोल सुरेश शहागडकर वय ३५ वर्षे रा. नाळवंडी रोड पेठ बीड यांनी फिर्याद दिली की, दिनांक १७/०२/२०२६ रोजी रात्री ११.५० व. चे सुमारास ते त्यांचे सहयोगनगर येथील श्री. समर्थ जनरल स्टोअर्स नावचे दुकान बंद करुन पायी घरी येत असतांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील रिक्षा स्टॉप जवळ असतांना समोरुन मच्छीमार्केट रोड करुन एक विना क्रमांकाच्या पांढऱ्या, पिस्ता रंगाच्या स्कुटी ॲक्सेसवर दोन अनोळखी इसम आले. त्यापैकी पाठीमागे बसलेला एक इसम खाली उतरुन फिर्यादी कडे जावुन फिर्यादीचे खिशात हात घालुन मोबाईल, चारचाकी वाहनाची चावी व रोख रक्कम ५०००/- रु. असे जबरदस्तीने काढुन घेवुन त्याचे साथीदारा सोबत स्कुटीवर बसुन पळुन गेला.

वगैरे मजकुराचे फिर्यादी वरुन पो.स्टे.ला गुरनं. ५७/२०२६ कलम ३०४(२), ३(५) भा.न्या.सं. प्रमाणे गुन्हा दिनांक १९/०२/२०२६ रोजी १७:४६ वाजता दाखल करण्यात आला.पो.स्टे.ला गुन्हा दाखल



होताच पेठ बीड पोलीस स्टेशनचे सपोनि. पुजारी व डी.बी. पथकातील पोलीस अंमलदार यांनी गुप्त बातमीदार कडुन माहीती हस्तगत करुन तसेच सि.सि.टि.व्ही फुटेज वरुन गुन्ह्यातील अनोळखी दोन आरोपीतांचा शोध घेतला असता आरोपी नामे ।) विजय धारासिंग सुतार वय २१ वर्षे रा. चांदण्याचा वाडा, काळा हनुमान ठाणा, पेठ

(उर्वरीत पान २ वर)

## भर रस्त्यावर दोनवेळा जीवघेणा हल्ला करणाऱ्या गुंडांचे ४८ तासाच्या आत शहर पोलिसांनी मुसक्या आवळल्या..!

# रस्त्यावर दादागिरी करणाऱ्या गुंडाना पोलिस अधिक्षकांचा थेट दणका..!!

बीड ।प्रतिनिधी

दिनांक १५ रोजी सकाळी १०:३० वाजण्याच्या सुमारास मोबाईल फोनवरून एका अज्ञात व्यक्तीने माहिती दिली की, सहयोग नगर परिसरातील सर्वेश्वर मंदिराजवळ चार महिला व एका पुरुषाने एका व्यक्तीस बेदम मारहाण करून जखमी केले आहे.शहर पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेऊन आरोपींचा ४८ तासाच्या आत अटक करून धाडसी कारवाई केली आहे.पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या मुळे गुंडांचे धाबे दणाणले आहेत.

सदर माहिती मिळताच PSI संदीप नेवरे व PSI महेश जाधव हे तात्काळ पेट्रोलिंग वाहनासह घटनास्थळी रवाना झाले.तपासा दरम्यान समोर आले की, पीडित सदाशिव धोंडिबा कोकाट (रा. पांडुरंग नगर, बहिरवाडी, बीड) हे आपल्या मुलासोबत सामान्य रुग्णालयाकडे जात असताना दोन महिला आरोपींनी त्यांना अडवून मोटारसायकलची चावी काढून घेतली. पीडित हे वयोवृद्ध असल्यामुळे त्यांना पुढे जाऊ देण्यास प्रतिकार करण्यात आला. त्यानंतर संबंधित महिलांनी प्रमुख आरोपीला घटनास्थळी बोलावून घेतले व इतर महिला आरोपींसह सर्वांनी मिळून भर रस्त्यात पीडितास मारहाण केली.

या घटनेचे व्हिडिओ शूटिंग झाल्यामुळे गुन्हा नोंद करण्यास व पुरावे गोळा करण्यास मोठी मदत झाली आहे. फिर्यादीनुसार आरोपींनी डोक्यावर बोथट वस्तूने मारहाण केली आहे. सदर आरोपींनी दोन दिवसांपूर्वी देखील याच पीडित पक्षास गंभीर दुखापत केली होती. त्या प्रकरणी कलम ३२६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद आहे. सलग दोन दिवस सार्वजनिक ठिकाणी हल्ला करून

(उर्वरीत पान २ वर)

## नाथापुर, पिंपळनेर, ईट, सांडरवण, म्हाळसजवळा, पिंपळादेवी, गंगनाथवाडी या ठिकाणी पोलिसांनी छापे मारुन

# ७ गुन्हे दाखल करत ३० हजाराची देशी व विदेशी अवैध दारु केली जप्त

बीड ।प्रतिनिधी

पोलीस ठाणे पिंपळनेर हद्दीमध्ये सपोनि घुगे, पोउपनि गोलवाल, परि. पोउपनि शिंदे व इतर अंमलदार व होमगार्ड यांनी पेट्रोलिंग दरम्यान गुप्त बातमीदार मार्फत माहीती घेऊन अवैध दारु विक्री करणाऱ्या इसमांवर पो.स्टे. हद्दीत नाथापुर, पिंपळनेर, ईट, सांडरवण, म्हाळसजवळा, पिंपळादेवी, गंगनाथवाडी या ठिकाणी छापे मारुन एकुण ७ गुन्हे दाखल करुन देशी व विदेशी दारु चा एकुण २९,१५०/-



रुपयाचा मुद्देमाल जप्त केला आहे.

दिनांक. १९/०२/२०२६ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती असल्याने बीड जिल्हयातील कायदा आणि सुव्यवस्था अबाधीत

(उर्वरीत पान २ वर)

# अंबड पंचायत समितीत भ्रष्टाचाराचा काळा कारभार उघड

## दोषी रोजगार सेवकावर अधिकाऱ्यांचे वरदहस्त, महिना उलटला तरी कारवाई का नाही ?

अंबड ।प्रतिनिधी

अंबड पंचायत समितीतील भ्रष्टाचाराचा काळा अध्याय पुन्हा एकदा उघडकीस आला असून प्रशासकीय यंत्रणेची निर्ढावलेली भूमिका जनतेच्या रोषाचा केंद्रबिंदू ठरत आहे. जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी दोषी ग्राम रोजगार सेवकावर कठोर कारवाई व रक्कम वसुलीचे स्पष्ट आदेश देऊनही महिना उलटला तरी अंबड पंचायत समिती प्रशासन कुंभकर्णी झोपेत आहे.या दिरंगाईमुळे दोषींना अभय देणारे ते अदृश्य हात कोणाचे ? असा संतप्त सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.




**अंबड पंचायत समिती मधील मग्रारोहयो चा घोटाळा अर्थसंकल्पीय अधिवेशनात गाजणार**

मग्रारोहयो अंतर्गत गट क्रमांक १५३ मधील विहिरीच्या कामात शासनाची दिशाभूल करून खोटी माहिती सादर केल्याचा गंभीर ठपका

(उर्वरीत पान २ वर)

### भ्रष्टाचाराचे रामभरोसे प्रशासन

एकीकडे पारदर्शक कारभाराचा डंका पिटला जातो, तर दुसरीकडे सिद्ध झालेल्या गुन्ह्यातही गुन्हेगाराला वाचवले जाते. हे केवळ निष्काळजीपणाचे प्रकरण नसून थेट प्रशासकीय गुन्ह्याचे स्वरूप घेत असल्याची चर्चा सुरू आहे. या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक विभाग किंवा राज्यस्तरीय समितीमार्फत चौकशीची मागणी जोर धरू लागली आहे.

# अंबड तहसीलदारांचा वाळू माफियांना अंतिम इशारा

## आपेगाव वाळू चोरी प्रकरणी गुन्हे दाखलआता थेट अटक, जप्ती आणि लिलाव



अंबड ।प्रतिनिधी

अंबड तालुक्यात अवैध वाळू उत्खनन आणि गौण खनिज चोरी करणाऱ्या वाळू माफियांविरुद्ध महसूल विभागाने आता थेट युद्ध पुकारले आहे.तहसीलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी श्री.विजय चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली अवैध धंद्यांचे कंबरडे मोडण्यासाठी कठोर आणि निर्णायक कायदेशीर मोहीम सुरू झाली असून सराईत गुन्हेगारांना आता थेट कारागृहाची हवा खावी लागणार आहे.आपेगाव-साष्टपिंपळगाव शिवारात मध्यरात्री मोठी कारवाई गुप्त बातमीदाराकडून मिळालेल्या खात्रीशीर माहितीनुसार दि.१६ फेब्रुवारी २०२६ च्या मध्यरात्रीपासून १७ फेब्रुवारीच्या पहाटेपर्यंत आपेगाव व साष्टपिंपळगाव शिवारातील गोदावरी नदीपात्रात मोठ्या प्रमाणावर वाळूचे अवैध उत्खनन आणि वाहतूक सुरू असल्याचे उघड झाले.

याप्रकरणी गोंदी पोलीस ठाण्यात प्रथम खबर अहवाल क्र.००४२/२०२६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.मुख्य आरोपी व १०-१२ अज्ञात साथीदारांवर गुन्हेया कारवाईत हायवा क्र. चक-२१-इक-५९३९ चा मालक सचिन अशोकराव देशमुख रा. रवना आणि लोडर चालक मंगेश माऊली चौधरी रा. आपेगाव यांच्यासह १० ते १२ अज्ञात साथीदारांविरुद्ध गुन्हे दाखल झाले आहेत.मंगेश चौधरी याने डोमलगाव गोंदी तसेच परिसरातील गावांमधील लोडर व हायवा चालकांना बोलावून मोठ्या प्रमाणावर वाळू चोरी करून भरून दिल्याचे निष्पन्न झाले आहे.परिसरातील ट्रॅक्टर व मिनी हायवांच्या माध्यमातून अवैध वाहतूक सुरू असल्याची खात्रीशीर माहिती प्रशासनाकडे आहे. ३० ते ४० ब्रास वाळूची बेकायदेशीर विक्री उघड

(उर्वरीत पान २ वर)

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777
6 x 6.5

**संपादकीय....**

# एकत्रिकरणाचं भवितव्य

ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे.

२८जानेवारीच्या सकाळी बारामतीत दुर्दैवी विमान अपघात झाला नसता, त्यात अजितदादा पवार यांचं निधन झालं नसतं, तर आज कदाचित सर्व वृत्तपत्रांत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसच्या एकत्रिकरणाच्या बातम्यांचे मथळे असते. 'कदाचित' म्हणण्याचं कारण एवढंच, की दिशा निश्चित होती; पण प्रक्रियेचे तपशील ठरत होते. दोन्ही राष्ट्रवादी एकमेकांविरोधात सर्वोच्च न्यायालयात पोहोचले असल्याने काही तांत्रिक बाबी आडव्या येऊ शकल्या असत्या. शिवाय, राजकीय घडामोडींत कधी कोणते फाटे फुटतील, हे सांगता येत नसतं. त्यामुळे, एखादी गोष्ट प्रत्यक्ष घडत नाही, तोपर्यंत त्याबाबत खात्रीने बोलण्याला काही अर्थ नसतो. 'घड्याळ'वाल्या राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते 'अशी काही चर्चा सुरू असल्याचं आम्हाला माहीत नव्हतं. तसं असतं, तर दादा आमच्याशी बोलले असते' असं सुरुवातीला म्हणाले. पण, त्यानंतर संबंधितांकडून चर्चेच्या फेऱ्यांचे अनेक तपशील, चित्रफितीच दाखवल्या गेल्याने या नेत्यांकडून पुन्हा तशा प्रकारचं वक्तव्य झालं नाही. आता उघड झालेल्या एकूण तपशिलावरून अशी चर्चा सुरू होती आणि खुद्द अजितदादाच त्यासाठी आग्रही होते, असं दिसतं. या चर्चेतील खाचाखोचा ते आपल्या पक्षातील सहकाऱ्यांना किती सांगत असतील, हा प्रश्न आहे. कारण, ज्यांच्या आग्रहाखातर दादा वेगळे झाले, त्या बहुतेक सगळ्या नेत्यांचा दोन्ही पक्षांच्या एकत्रिकरणाला विरोध होता, हे त्यांनाही माहीत होतं. त्यांचा तो विरोध आजही दिसतो आहेच. या विरोधाला काही तात्त्विक, वैचारिक आधार आहे, असं नाही. शुद्ध व्यावहारिक आहे. अजितदादांच्या वारसदारांना याची व्यवस्थित कल्पना आहे. सुनेत्रा पवार यांची उपमुख्यमंत्री म्हणून निवड, पदग्रहणापूर्वीचे सोपस्कार, दिल्ली भेटीसाठीचा आग्रह या वारसदारांना समजत नाही, असं नाही. पण, आत्ताच काही भूमिका जाहीर करण्याची गरज नाही. सगळ्यांचं ऐकून, प्रत्येकाची पावलं कुठे पडतात हे नीट समजावून घेऊन मगच आपली भूमिका स्पष्ट करण्याचं त्यांनी ठरवलं असावं. कुठेही काहीही न बोलता सरकारमधील, पक्षातील; अगदी पक्ष संघटनेतील घडी बसवण्याला त्यांनी प्राधान्य दिलेलं दिसतं. आजच्या घडीला हेच धोरण योग्य आहे. अजितदादांचे वारसदार नवखे किंवा अपरिपक्व आहेत, त्यांना आपल्यालाच पुढे घेऊन जायचं आहे, असा समज कोणी करून घेतला असेल, तर त्यांना लवकरच ठेच लागण्याची शक्यता यावरून दिसते. दोन राष्ट्रवादी वेगळ्या झाल्या, तेव्हांही त्याबाबतच्या चर्चा वेगवेगळ्या पातळ्यांवर कितीतरी दिवस सुरू होत्या. तेव्हांही पक्षात आणि पवार कुटुंबात अशा दोन्ही आघाड्यांवर स्वतंत्रपणे बोलणी होत होती. दोन्ही बाजूला अग्रभागी पवार कुटुंबातील व्यक्तीच असल्याने साहजिकच त्यावेळीही 'केवळ पक्षात फूट, की कुटुंबात दरी?' अशा प्रकारच्या चर्चा झाल्या होत्या. भारतीय जनता पक्षाबरोबर जाण्यासाठी जे आग्रही होते, त्यातील प्रत्येकाची त्या आग्रहामागे वेगवेगळी कारणं होती. त्याची चर्चाही त्यानंतर पुष्कळ झाली होती. पण, तो निर्णय घेण्याच्या काळात स्वतः अजितदादा किती तणावात होते, याची कल्पना भारतीय जनता पक्षातील वरिष्ठ नेत्यांसह राजकीय वर्तुळालाही आहे. दोन राष्ट्रवादी स्वतंत्र झाल्यानंतरही सुरुवातीचे काही महिने सोडले, तर नंतर दोन्ही बाजूंनी परस्परांवरचे वार थांबले होते. विधिमंडळाच्या अधिवेशन काळात दोन्ही पक्षांचे नेते आणि आमदार किती समन्वयाने वावरायचे, हे तर जगजाहीर आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत दोन्ही पक्षांनी अनेक ठिकाणी आघाडी करण्याचा निर्णय घेतला होता. राष्ट्रवादीचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष प्रफुल्ल पटेल आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिल्लीत शहा यांची भेट घेऊन त्यांना त्याची कल्पनाही दिली होती. भाजपसारख्या तगड्या पक्षाच्या युतीत असताना त्यांच्या संमतीशिवाय असा काही निर्णय कोणी पक्ष परस्पर घेईल, हे संभवत नाही. म्हणजे, दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसने केलेली निवडणूक आघाडी ही भाजपला पूर्ण अवगत होती आणि त्यांची त्याला मूळ संमती होती, असं मानायला जागा आहे. भाजपचं केंद्रीय नेतृत्व राजकीय परिणामांचा विचार केल्याशिवाय आणि एखाद्या राजकीय घडामोडीचं पूर्ण तार्किक चित्र स्पष्ट असल्याशिवाय गाफीलपणे परवानगी देणंही शक्य वाटत नाही. राष्ट्रवादी काँग्रेसमधील घडामोडींची माहिती महायुतीतल्या अन्य पक्षांच्या वरिष्ठ वर्तुळात असणार असा निष्कर्ष यावरूनच काढला जातो आहे.

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१८ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सुमेरा फेरोज शेख | मुलगी | २०.११.२००० |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१६ दि.०५.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अशरफ फेरोज शेख | मुलगा | ०६.०१.२००७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१७ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **अब्दुल्ला अशरफ शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | फेरोज अब्दुल्ला शेख | मुलगा | १७.१२.१९७८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१३ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दूल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा** च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | आमेर फेरोज शेख | मुलगा | १४.०४.१९९८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१४ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सानिया फेरोज शेख | मुलगी | ०७.१२.२००२ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**
**जा.क्र.२०२५/सेतु/कावि-१०१५ दि.०३.११.२०२५**

## जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **फेरोज अब्दुल्ला शेख, रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिमा फेरोज शेख | मुलगी | २०.०५.१९९७ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- -/-/- रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

---

# शाळेच्या वतीने मुख्यमंत्री सहाय्यता निधी साठी भरीव मदत

धर्माबाद ( अशोक पडोळे ) :- धर्माबाद शहरातील RKSVM CBSE शाळेने सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्यांची जाणीव जपत राजाराम काकानी सहकार विद्या मंदिर परिवाराने पूरग्रस्त शेतकऱ्यांच्या मदतीसाठी मुख्यमंत्री सहायता निधीस ४,३५,९१७ रकमेचा धनादेश सुपूर्द केला. वेस्टर्न इंडिया फुटबॉल असोसिएशन आयोजित व RKSVM प्रायोजित सब-ज्युनिअर आंतर-जिल्हा फुटबॉल अजिंक्यपद स्पर्धेनिमित्त धर्माबाद येथे आगमन झालेल्या मा. जिल्हाधिकारी श्री राहुलजी कर्डिले याना हा धनादेश औपचारिकरित्या प्रदान करण्यात आला.

दिनांक २९ व ३० ऑगस्ट २०२५ रोजी झालेल्या अतिवृष्टीमुळे धर्माबाद व परिसरात पूरस्थिती निर्माण झाली होती. या नैसर्गिक आपत्तीमुळे जनजीवन विस्कळीत झाले असून विशेषतः शेतकरी बांधवांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. त्यांच्या कष्टाचे पीक नष्ट झाल्याने अनेक कुटुंबे आर्थिक व मानसिक संकटात सापडली. या परिस्थितीची गंभीरता लक्षात घेऊन आरकेएसव्हीएम परिवाराने संवेदनशील आणि सामूहिक निर्णय घेतला. शाळेचे व्यवस्थापकीय संचालक श्री सुबोध काकानी यांच्या प्रेरणादायी नेतृत्वाखाली सर्व शिक्षक, कर्मचारी व व्यवस्थापन यांनी एकमताने आपला दिवाळी बोनस मुख्यमंत्री सहायता निधीस अर्पण करण्याचा निर्णय घेतला. खरा सण म्हणजे दुःखात असणाऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे, या भावनेतून हा निर्णय घेण्यात आला.

ही मदत केवळ आर्थिक सहाय्य नसून शेतकरी बांधवांप्रती करुणा, एकात्मता आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा एक अर्थपूर्ण प्रयत्न आहे. या योगदानाद्वारे संकटग्रस्त कुटुंबांच्या जीवनात आशेचा किरण निर्माण करण्याचा आणि त्यांना नैतिक आधार देण्याचा प्रयत्नअसल्याची भावना संस्थेतर्फे व्यक्त करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी संस्थेच्या या उपक्रमाचे कौतुक करत खरे नेतृत्व समाजोपयोगी कृतीतूनच दिसून येते, असे मत व्यक्त केले. अशा उपक्रमांमुळे समाजात सामूहिक जबाबदारीची भावना व मानवी मूल्ये अधिक दृढ होतात, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.



कार्यक्रमात उपस्थित शिक्षक, कर्मचारी व व्यवस्थापन सदस्यांनी भविष्यातही सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत गरजूंच्या मदतीसाठी सदैव तत्पर राहण्याचा संकल्प व्यक्त केला आणि एकता, सहानुभूती व सामाजिक जबाबदारीचा संदेश दृढ केला.

---

पान १ वरून...

**परळीचे तहसीलदार ....**

स्विकारणार नाहीत असे कळवुन आपण झालेल्या कारवाईवरुन कारवाई करावी अशी विनंती केल्याने आम्ही लोकसेवक मुंडे यांना परळी वै. येथुन ताब्यात घेवुन त्यांचे विरुध्द आज दिनांक २०.०२.२०२६ रोजी पोलीस ठाणे परळी वै.शहर येथे कलम ७,भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

आलोसे यांच्या अंग झडतीत एक पल कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट किमती ५०००० हजार रूपये व एक सॅमसंग कंपनिचा मोबाईल हॅन्डसेट किमती ३०००० हजार रूपये जप्त केला असून आरोपी यांची घरझडती प्रक्रिया सुरु आहे. आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले आहे.

सापळा अधिकारी सोपान चिट्टमपल्ले पो.उप अधीक्षक असून तपास अधिकारी. समाधान कवडे, पोलीस निरीक्षक ला.प्र.वि.बीड हे आहेत.

ही कारवाई श्रीमती, माधुरी केदार कांगणे पोलीस अधीक्षक, ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर, शशिकांत शिंगारे, अपर पोलीस अधीक्षक , ला. प्र. वि. छत्रपती संभाजीनगर,सक्षम अधिकारी -अप्पर मुख्य सचिव महसूल व वन विभाग महाराष्ट्र शासन यांच्या मार्गदर्शनाखाली सोपान चिट्टमपल्ले पो.उप अधीक्षक ला. प्र. वी. बीड यांनी पोलीस उपअधीक्षक श्री.सोपान चिट्टमपल्ले, पोलिस निरीक्षक श्री.समाधान कवडे,सफौ/ सुरेश सांगळे, पोहेकॉ/ पांडुरंग काचगुंडे, मच्छिंद्र बीडकर, अनिल शेळके, अमोल खरसाडे, अविनाश गवळी, प्रदीप सुरवसे , संतोष राठोड, राजकुमार आघाव, बिभीषण सांगळे, सचिन काळे चालक गणेश म्हेत्रे, अंबादास पुरी यांच्या पथकाने केली.

**पेठ बीड पोलीसांनी....**

बोड ता.जि.बीड २) आमीर खान अकबर खान पठाण वय २९ वर्षे रा. ईस्लामपुरा पेठ बीड ता.जि.बीड यांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे तपासात निष्पन्न झाल्याने त्यांना आवघ्या एक तासाचे आत ताब्यात घेवुन त्यांचे कडुन गुन्ह्यात गेला माल मोबाईल किंमती २६,०००/- रु.. व वापरलेली पांढऱ्या, पिस्ता रंगाची ॲक्सेस स्कुटी जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगीरी ही मा. पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक, श्री. सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी बीड, श्रीमती पुजा पवार, यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, मारुती खेडकर, सपोनि. प्रितमकुमार पुजारी, पोह/नितीन राठोड, पोह/सुभाष मोठे, पोह/अजित शिकेतोड, पोह/ हनुमान उगले, पो.अं. पांडुरंग परजणे, पो. अं. औदुंबर गिरी, पोअं. दिपक भोजे सर्व पोलीस ठाणे पेठ बीड यांनी केली असुन पुढील तपास सपोनि, प्रितमकुमार पुजारी हे करत आहेत.

**नाथापुर, पिंपळनेर, ईट, ...**

राखण्यासाठी दिनांक १९/०२/२०२६ रोजी बीड जिल्हयातील अनुज्ञाप्ती बंद बाबतचे मा. जिल्हाधिकारी साहेब बीड यांनी आदेश निर्गमीत कले होते. तसेच मा. पोलीस अधीक्षक साहेब बीड यांनी शिवजयंती अनुषंगाने पो.स्टे. हद्दीत सतर्क पेट्रोलिंग करुन अवैद्य धंद्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. मा. पोलीस अधीक्षक साहेब बीड यांचे पो.स्टे. हद्दीत चालणारे अवैध धंद्यावर कठोर कारवाई करणे बाबतचे सक्त आदेश असल्याने शिवजयंती बंदोबस्त या पार्श्वभुमीवर

सदरची कामगिरी ही पोलीस अधीक्षक श्री नवनित काँवत, श्री. सचिन पांडकर, अपर पोलीस अधीक्षक बीड, श्रीमती पुजा पवार, उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभाग बीड यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि/मधुसुदन घुगे, पोउपनि/ए.सी. गोलवाल, परि. पोउपनि/पंकज

पान १ वरून...

शिंदे, पोशि/२२७३ सादीक पठाण, पोशि/२०२१ शशीकांत ढाकणे, पोशि/९८ अनलि विघ्ने, पोशि/१९०४ पिंपळे होमगार्ड/जवंजाळ, शेलार, थापडे सर्व पो.स्टे पिंपळनेर यांनी केलेली आहे. भविष्यातही अवैद्य दारु विक्री करणारे व कायद्याला न जुमानणारे व्यक्ती विरुध्द कार्यवाही करुन त्यांचेवर कायदेशीर कार्यवाही करण्याचे संकेत श्री. नवनित काँवत, पोलीस अधीक्षक बीड व अपर पोलीस अधीक्षक श्री सचिन पांडकर यांनी दिले आहेत.

**भर रस्त्यावर दोनवेळा...**

आरोपींनी गंभीर स्वरूपाची मारहाण केल्यामुळे त्यांच्या हिंसक व धोकादायक प्रवृत्तीची नोंद घेण्यात आली. प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन संबंधित वरिष्ठ अधिकाऱ्यांशी चर्चा करून कलम ३०७ भादंवि (खून करण्याचा प्रयत्न) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील प्रमुख आरोपी विकी उर्फ पवन किशोर वीर (रा. नवनाथ नगर, चखऊ, बीड) यास ४८ तासांच्या आत अटक करण्यात आली असून न्यायालयाकडून ५ दिवसांची पोलीस कोठडी (झउठ) मंजूर झाली आहे. प्रत्यक्षदर्शी व तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपीविरुद्ध भक्कम पुरावे गोळा करण्यात आले आहेत. रस्त्यावर दहशत निर्माण करणाऱ्या अशा प्रकारच्या घटनांना आळा घालण्यासाठी आरोपीविरुद्ध पुढील प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येणार आहे. सदर कारवाई पोलीस अधीक्षक श्री. नवनीत काँवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर, तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली, पोलीस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक बाबा राठोड, पोलीस हवालदार गहिनीनाथ बावनकर, तुळजा सपकाळ, शेख इलियास, मंगेश शिंदे व नवले यांनी संयुक्तरीत्या पार पाडली आहे.

**अंबड पंचायत समितीत....**

संबंधित ग्राम रोजगार सेवकावर ठेवण्यात आला आहे. चौकशीनंतर डिसेंबर २०२५ व जानेवारी २०२६ मध्ये जिल्हा परिषद जालना व पंचायत समिती अंबड यांनी कडक आदेश निर्गमित केले होते. कागदावर कडक आदेश प्रत्यक्षात ढिसाळ अंमलबजावणी आदेशात स्पष्ट नमूद होते दोषी ग्राम रोजगार सेवकाला तात्काळ पदावरून कमी करा. विहिरीवर झालेला खर्च ७.८०% वार्षिक व्याजासह वसूल करा. केलेल्या कारवाईचा अहवाल वरिष्ठ कार्यालयात तात्काळ सादर करा.परंतु दि. २२ जानेवारी २०२६ रोजी अंतिम आदेश निघूनही आज महिनाभर उलटून गेला तरी संबंधित रोजगार सेवक अद्याप पदावर मिरवत आहे.वसुली तर दूरच, साधी नोटीसही बजावण्यात आलेली नाही.यावरून जिल्हा परिषदेच्या आदेशांना अंबड पंचायत समितीने थेट कचऱ्याची टोपली दाखवल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

अधिकाऱ्यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात

या संपूर्ण प्रकरणात तांत्रिक सहाय्यक अधिकारी (झढज) प्रविण घाडगे, तत्कालीन सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (-झज) हरी पवार आणि तत्कालीन उऊएज यांची भूमिका संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे. तांत्रिक अंमलबजावणी करणारे अधिकारीच दोषींना संरक्षण देत असतील तर न्याय कुणाकडे मागायचा ? असा सवाल पंचायत समितीच्या गोटात जोर धरू लागला आहे.

जनतेच्या पैशावर डल्ला कारवाई कुठे ?

शासनाचे पैसे गिळंकृत करणाऱ्यांवर कारवाई का होत नाही ? हा जनतेच्या पैशावर डल्ला आहे.तात्काळ निलंबन आणि वसुली झाली नाही तर तीव्र आंदोलन छेडू असा इशारा स्थानिक ग्रामस्थ व सामाजिक कार्यकर्त्यांनी दिला आहे.

पान १ वरून...

घोटाळ्याचा लेखाजोखा आमदारांकडे अर्थसंकल्पीय अधिवेशनात स्फोट होणार ?

अंबड पंचायत समितीतील मग्रारोहयो घोटाळ्याचा संपूर्ण लेखाजोखा वार्सेवाचे आमदारांकडे सादर झाल्याची माहिती समोर आली आहे. जुन्या सिंचन विहिरी नव्याने काढलेली बिले प्रांजल रस्त्याची कामे तसेच इतर अनेक कामांच्या तक्रारी जिल्हा परिषद जालना कार्यालयात प्रलंबित असून कारवाई मात्र गुलदस्त्यात ठेवण्यात आली आहे.अंबड पंचायत समितीचे तत्कालीन गट विकास अधिकारी व्ही.व्ही.जमदाडे यांच्यावरही कारवाईची टांगती तलवार असल्याचे संकेत मिळत आहेत.येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात हा घोटाळा गाजणार असून पांघरून घातलेले अनेक प्रकरणे उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.चेंडू आता गटविकास अधिकाऱ्यांच्या कोर्टातआता प्रश्न एवढाच गटविकास अधिकारी वरिष्ठांच्या आदेशाचे पालन करून दोषींना घरचा रस्ता दाखवणार की अर्थपूर्ण संबंध जपणार ? जनतेचे लक्ष याकडे लागले आहे.

**अंबड तहसीलदारांचा ...**

कारवाईदरम्यान अंदाजे ३० ते ४० ब्रास वाळूची विनापरवाना चोरटी विक्री झाल्याचे स्पष्ट झाले असून शासनाचे लाखो रुपयांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. सराईत गुन्हेगारांवर आता दिवाळखोरी जप्ती आणि अटकेची तलवार मुख्य आरोपी मंगेश चौधरी हा सराईत गुन्हेगार असल्याचे निष्पन्न झाले असून यापूर्वी मालमत्तेवर बोजा असतानाही त्याने पुन्हा गुन्हा केल्याने प्रशासनाने अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. प्रशासनाची कठोर पावले सातबारावर महाराष्ट्र शासन नाव दंड न भरल्यास आरोपींच्या जमिनीवर शासनाचे नाव लावून जाहीर लिलाव केला जाणार. दिवाळखोर घोषित करण्याची प्रक्रिया महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ अंतर्गत थकबाकी न भरणाऱ्यांना दिवाळखोर घोषित करून अटक प्रक्रिया सुरू. वाहनांची कायमस्वरूपी जप्ती गुन्ह्यात वापरलेली वाहने व यंत्रसामग्री शासनाधीन करून कायमस्वरूपी जप्त केली जाणार. २५ गावांतील वाळू माफियांवर रडार गोपनीय पथके तैनात केवळ आपेगावपुरती कारवाई मर्यादित न राहता तालुक्यातील २५ पेक्षा जास्त गावांमध्ये अवैध उत्खनन केंद्रांचे सर्वेक्षण सुरू आहे.शहागड व विहमाडवा मार्गे होणाऱ्या चोरट्या वाहतुकीवर लक्ष ठेवण्यासाठी विशेष गोपनीय पथके तैनात करण्यात आली आहेत. जनतेला थेट आवाहन माहिती द्या ओळख गोपनीय तहसीलदार विजय चव्हाण यांनी नागरिकांना थेट आवाहन केले आहे वाळू चोरीची माहिती द्या फोटो,व्हिडिओ व पुरावे सादर करा माहिती देणाऱ्यांची ओळख पूर्णपणे गोपनीय ठेवली जाईल. कारवाईत सहभागी वरिष्ठ अधिकारी ही व्यापक मोहीम जिल्हाधिकारी श्रीमती आशिमा मित्तल, अप्पर जिल्हाधिकारी श्री. रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी श्री. शशिकांत हदगल आणि उपविभागीय दंडाधिकारी श्री. उमाकांत पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. प्रत्यक्ष पथकात विजय चव्हाण तहसीलदार अंबड श्री.बामणावत मंडळ अधिकारी दीपक संजय गवारे तलाठी आपेगाव सुनील तेजराव उबरहंडे तलाठी, साष्टपिंपळगाव यांच्यासह महसूल व पोलीस कर्मचारी सहभागी होते. हा इशारा नाही प्रत्यक्ष कारवाई आहे तहसीलदार विजय चव्हाण

तालुक्यातील नैसर्गिक साधनसंपत्ती लुटणाऱ्यांची आता गय केली जाणार नाही.ज्यांच्या मालमत्तेवर बोजा आहे त्यांनी तात्काळ दंड भरावा अन्यथा अटकेची कारवाई आणि मालमत्तेचा लिलाव अटळ आहे. हा केवळ इशारा नसून प्रत्यक्ष कृतीला सुरुवात झाली आहे असा थेट इशारा तहसीलदार विजय चव्हाण यांनी दिला. वाळू माफियांमध्ये खळबळ तालुक्यात प्रशासनाचा धडाका अंबड तालुक्यात वर्षानुवर्षे राजरोस सुरू असलेल्या वाळू माफियांच्या साम्राज्यावर पहिल्यांदाच प्रशासनाने असा कठोर घाव घातल्याने माफिया टोळ्यांमध्ये खळबळ उडाली आहे. आता ही मोहीम पुढे किती दूर जाते आणि राजकीय छत्रछाया असलेले मोठे मासे जाळ्यात अडकतात का याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# घनसावंगीतील कै.दत्तासाहेब देशमुख विद्यालयाची दैदीप्यमान कामगिरी

## राज्यस्तरावर 'ए+' श्रेणीने शाळेच्या गुणवत्तेवर शिक्कामोर्तब

घनसावंगी ।प्रतिनिधी

शाळा गुणवत्ता मूल्यांकन व आश्वासन आराखडा अंतर्गत झालेल्या बाह्य मूल्यांकनात मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी या शाळेला राज्यस्तरावर अ+ श्रेणी प्राप्त झाली असून ही कामगिरी शाळा संस्था आणि संपूर्ण घनसावंगी तालुक्यासाठी अत्यंत अभिमानास्पद ठरली आहे. राज्यातील मोजक्या शाळांमध्ये घनसावंगीच्या विद्यालयाचा समावेश राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद पुणे यांच्या अंतर्गत राज्य शाळा मानक प्राधिकरण कक्षाच्या माध्यमातून सर्व माध्यमांच्या व सर्व व्यवस्थापनाच्या शाळांचे गुणवत्ता मूल्यांकन करण्यात आले. या प्रक्रियेत तब्बल १,०२,६७५ शाळांनी सहभाग नोंदवला असून त्यापैकी सन २०२५-२६ मध्ये १०,६४४ शाळांचे बाह्य मूल्यांकन पूर्ण करण्यात आले. या मूल्यांकनातून राज्यातील केवळ ४२९ प्राथमिक माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयांना अ+ श्रेणी प्रदान करण्यात आली असून, त्यामध्ये मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे कै. दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय घनसावंगी यांचा गौरवपूर्ण समावेश आहे.

संस्थेच्या गुणवत्तेच्या वाटचालीला मोठी भरारी

या उल्लेखनीय यशासाठी संस्थेचे अध्यक्ष व माजी आरोग्यमंत्री मा.श्री.राजेश टोपे, सचिव मनीषाताई टोपे, तत्कालीन सेवानिवृत्त मुख्याध्यापक पंढरीनाथ अटकळ,कार्यरत मुख्याध्यापक केशव अटकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

माजी मंत्री राजेश टोपे यांचे अभिनंदन व शुभेच्छा

या ऐतिहासिक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. राजेश टोपे, सचिव मनीषाताई टोपे, प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड, सहा. प्रशासकीय अधिकारी राहुल भालेकर यांनी सेवानिवृत्त मुख्याध्यापक पंढरीनाथ अटकळ, कार्यरत मुख्याध्यापक केशव अटकर तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

घनसावंगीच्या शैक्षणिक क्षेत्रात सुवर्णपान

कै.दत्तासाहेब देशमुख माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या या यशामुळे मत्स्योदरी शिक्षण संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेच्या प्रवासाला नवी दिशा मिळाली असून घनसावंगीच्या शैक्षणिक क्षेत्रात सुवर्णपान लिहिले गेले आहे.

# गुरुनानक प्राथमिक विद्यालयात शिवजयंती सोहळा साजरा



बीड ।प्रतिनिधी

श्री विठ्ठल गड शिक्षण प्रसारक मंडळ सारणी सांगवी तालुका केज जिल्हा बीड संचलित गुरुनानक प्राथमिक विद्यालयात स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती विद्यार्थ्यांनी मोठ्या आनंद आणि उत्साहात साजरी केली.

याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेच्या मुख्याध्यापक श्रीमती पवार एस. ए.या होत्या तर प्रमुख मार्गदर्शकाची भूमिका श्रीमती मुंडे एस.व्ही.व श्री गदळे आर. ए. यांनी पार पाडली. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन श्री तांदळे ए. ए.यांनी केले तर आभार श्रीमती पव्हणे पी. एम.यांनी मानले.शाळेतील विद्यार्थ्यांनी शिवचरित्राच्या विविध पैलूंवर व्यक्त होत अभ्यासपूर्ण प्रकाश टाकला तर काही विद्यार्थिनींनी 'झुलवा पाळणा बाळ शिवाजीचा'या गीतावर उत्तम नृत्य सादरीकरण केले. या उत्सवाचे प्रमुख आकर्षण होते छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित नाट्यप्रसंग. श्रीमती डोंगरे यु. एम. यांच्या मार्गदर्शनाखाली सादरीकरण केले.शिवरायांनी स्वराज्याची स्थापना केली ते निष्ठावान मावळ्यांच्या साथीने इयत्ता चौथी ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी सावळ्या तांडेल हा मावळा आणि हिरकणीची साहसकथा हुबेहूब साकारली. हे प्रसंग पाहून सर्वजण भारावून गेलेले होते.उपस्थित सर्व विद्यार्थी व पालकांनी विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नाला दाद दिली. 'छत्रपती शिवाजी महाराज की जय' च्या घोषणांनी वातावरण शिवमय झाले होते व अखेरीस नाटकात सहभागी विद्यार्थ्यांनी केलेल्या शिवगर्जनेमुळे उपस्थितांच्या अंगी चैतन्य संचारले. या कार्यक्रमाचे संपूर्ण व्यवस्थापन श्री ठोकरे एम. व्ही. यांनी केले तर श्रीमती शेळके मॅडम यांनी कार्यक्रम यशस्वीतेसाठी सहकार्य केले.

# नवोदय विद्यालयात शिव जंयती निमित्त उत्सवाची धमाल

## शिवरायांचा इतिहास विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी - गिताभाभी पवार

गेवराई ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती स्वाभिमान, स्वराज्य आणि धैर्याच्या तेजस्वी परंपरेची आठवण आहे. ही परंपरा विश्वासाचे प्रतिक असून, महाराष्ट्राच्या मातीत जन्मलेला हा असामान्य पराक्रमी योद्धा दूरदृष्टीचा कुशल प्रशासक, धर्मनिरपेक्ष शासक आणि लोककल्याणाची जाणीव असलेला लोकनायक होता. शिवाजी राजेंनी रोवलेली लोककल्याणाची मुहूर्तमेढ , विद्यार्थ्यांनी नेहमीच लक्षात ठेवून



वाटचाल करावी, असे प्रतिपादन गेवराई च्या नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी येथे केले. गढी ता. गेवराई जि.बीड येथील जवाहर नवोदय विद्यालयात, गुरूवार ता. १९ रोजी सायंकाळी सहा वाजता आयोजित करण्यात आलेल्या शिव जयंतीच्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. व्यासपीठावर प्राचार्य विजयकुमार बोस, ज्येष्ठ पत्रकार सुभाष सुतार यांची उपस्थिती होती. छत्रपति शिवाजी राजे विश्वासाचे प्रतिक म्हणून, जगभरात ओळखले जातात असे विचार नवोदय विद्यालयाचे प्राचार्य विजयकुमार बोस यांनी येथे व्यक्त केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शाळेच्या विद्यार्थिनी केले तर आभार प्रकाश कांबळे यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अनंत वडघणे, विजयकुमार घाडगे, प्रदुम्न सिंग, कदम सर, पंकज दुर्गे यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# प्रा. डॉ. तानाजी आगळे यांची खो-खो च्या राष्ट्रीय निवड समितीवर वर्णी

बीड ।प्रतिनिधी

तालुका पाटोदा येथील वसंतदादा पाटील महाविद्यालयात क्रीडा विभागात कार्यरत असणारे क्रीडा प्राध्यापक डॉ. तानाजी आगळे यांनी गेल्या २९ वर्षांच्या कार्यकाळामध्ये अनेक राज्य, राष्ट्रीय विद्यापीठ खेळाडू घडवले आहेत. त्यांच्या या खेळाडू हिताचे कार्य लक्षात घेऊन त्यांची खो-खो च्या राष्ट्रीय निवड समितीवर निवड करण्यात आली आहे.या निवडीमुळे खो खो च्या क्रीडा क्षेत्रात बीड जिल्ह्याचे नाव उंचावले आहे.

वसंतदादा पाटील महाविद्यालयाचा खो-खो संघ विद्यापीठ स्तरावर आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेत गेले २२-२३ वर्षांपासून सातत्याने कधी विजयी तर कधी उपविजेयी स्थानावर असतो. तसेच कनिष्ठ विभागाचा खो-खो मुला मुलींच्या संघाने जिल्हा, विभाग व राज्यस्तरावर अनेक पारितोषिके महाविद्यालयाला मिळवून दिली आहेत. अशा या गुणवान खेळाडूला आगळे सरांचे मार्गदर्शन सातत्याने लाभत आहे. आगळे सर हे महाविद्यालयीन कार्यभार साभाळून दैनंदिन सायंकाळच्या सत्रात क्रीडा संकुलाच्या खो-खो क्रीडांगणावर प्रशिक्षण देतात. अशा या त्यांच्या सर्व कार्याची नोंद घेऊन ओडिसा येथील भुवनेश्वर (कटक अथागढ ) येथे होणाऱ्या कुमार/कुमारी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी संघ निवडीची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली आहे. त्यांच्याबरोबर गणेश ताटे (नाशिक) व सचिन पाटील (जालना) हे संघ निवड समिती सदस्य असून वरील स्पर्धेसाठी नि:पक्षपातीपणे संघ निवड करतील असा विश्वास खो-खो महाराष्ट्र समन्वयक संघाच्या वतीने राष्ट्रीय समन्वयक खो-खो चे भीष्माचार्य मा. श्री. सुरेश शर्मा (दिल्ली) यांनी तसेच खो-खो महाराष्ट्र समन्वयक मा. श्री. सुरेश गांधी (ठाणे), श्री. मंदार देशमुख (नाशिक), अजय पवार (अहिल्यानगर) प्रशांत पवार (सांगली) यांनी व्यक्त केला आहे.

वरील निवडी बद्दल मा. जयदत्त अण्णा क्षीरसागर(माजी मंत्री), डॉ. भारतभूषण क्षीरसागर, मा. डॉ. दीपाताई क्षीरसागर , डॉ. योगेश दादा क्षीरसागर, डॉ. सारिका ताई क्षीरसागर, मा. आ. संदीप भैया क्षीरसागर, मा. आ. विजयसिंह पंडित, मा. माजी मंत्री मा. प्रा. सुरेश नवले, माजी मंत्री मा. सय्यद सलीम साहेब , मा. शाहेद पटेल, मा. सुनील क्षीरसागर, मा. दिलीप खिस्ती, प्राचार्य डॉ. बळीराम राख, डॉ. अभय क्षीरसागर, उपप्रचार्य प्रा. डॉ. नामदेव चांगण, पर्यवेक्षक प्रा. श्री. अनिल जोगदड, श्री. बिबीशन पाटील, श्री. पवन वाटोडे (धाराशिव), श्री. गंगाधर मोदाळे(संभाजीनगर), मा. अरविंद विद्यागर (जिल्हा क्रीडा अधिकारी) बीड, योगेश करांडे, मा. तानाजी आबा कदम (अध्यक्ष जिल्हा दूध



संघ), राष्ट्रीय खेळाडू श्री. तानाजी मेटे, श्री. विष्णू भैय्या वाघमारे, नगरसेवक श्री. शुभम धूत, श्री. नितीन साखरे, खो-खो खेळाडू श्रीमती गीतांजली देशपांडे/कुलकर्णी (अंबाजोगाई), राणी शिंदे/हंबर्डे , प्रा. चित्राताई आगळे (मुली प्रशिक्षिका), यांनी अभिनंदन करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

# अनंत श्री विभूषित जगदुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी , पादुका दर्शन सोहळा

बीड ।प्रतिनिधी

दक्षिण पीठ, नाणीज धाम, यांचा २१ फेब्रुवारी २०२६ रोजी वार शनिवार सकाळी १० वाजता बीड -जालना रोड श्री संत सेवालाल महाराज चौक कॅनॉल रोड बीड.ता.जि.बीड भव्य पादुका दर्शन सोहळ्याचे आयोजन केलेले आहे. जगद्गुरु रामानंदाचार्यजी नरेंद्राचार्यजी यांच्या रामानंद संप्रदायाच्या वतीने देशभरामध्ये वेगवेगळ्या माध्यमातून समाज उपयोगी कार्य केले जाते यात संस्थानच्या वतीने विनामूल्य ५४ अंम्बुलेंस राष्ट्रीय महामार्गावर चालतात, गोरगरीब व गरजू मुलांना इंग्रजी माध्यमाचे शिक्षण बारावीपर्यंत मोफत दिलं जातं, हिंदू धर्मातून इतर धर्मात गेलेल्या लोकांना हिंदू धर्मात परत आणून त्यांचा रोटी बेटीचा व्यवहार संप्रदायामार्फत चालू करून दिला आहे, लाखो लोकांची व्यसन मुक्ती आजपर्यंत नरेंद्रचार्यजी महाराजांनी केली आहे, आताच ४ जानेवारी ते १८ जानेवारी दरम्यान या पंधरा दिवसाच्या कालावधीमध्ये सांप्रदायाच्या माध्यमातून १ लाख ७१ हजार १५० रक्त कुपेकेच सांप्रदायाच्या मार्फत महाराष्ट्र शासनाला दान करण्यात आलं हा विश्व विक्रमच आहे १३३ अवयव दान या संप्रदायाच्या माध्यमातून झालेले आहेत, त्याचबरोबर १७९ देहदान महाराष्ट्रातील विविध मेडिकल कॉलेजला संप्रदायामार्फत सुपूर्द करण्यात आले तसेच पाणी आडवा पाणी जिरवा उपक्रमाअंतर्गत संपूर्ण महाराष्ट्रात ४५९८ कच्चे बंधारे बांधून एक नवीन विक्रम झाला आहे.

मागे महाड, सांगली, कोल्हापूर, रत्नागिरी येथे पूर परिस्थिती निर्माण झाली त्यावेळेला सांप्रदायामार्फत मदतीचा हात देण्यात आला त्यामध्ये धान्यवाटप असेल साफ सफाईचे कामे असतील हे सर्व सांप्रदायमार्फत केले गेले, असे अनेक विविध उपक्रम सांप्रदायामार्फत राबविण्यात येत आहेत दरवर्षी पादुका दर्शन सोहळ्याच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप असेल, शाळेला प्रयोग शाळेचे साहित्य वाटप असेल, शेतकऱ्यांना गाई, म्हशी, शेळ्यांचे, कृषी पंप साहित्याचे, बियाणाचे वाटप असेल, असे अनेक उपक्रम सांप्रदायमार्फत समाज उपयोगी चालवले जातात.

या कार्यक्रमा दिवशी २१ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजता छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथून भव्य शोभा यात्रेला प्रारंभ होणार आहे १० वाजेपर्यंत शोभायात्रा कार्यक्रमा स्थळी पोहोचणार आहे, कार्यक्रमाच्या ठिकाणी दिवसभर विविध कार्यक्रम चालणार आहेत यात पादुका व गुरुपूजन सोहळा जगद्गुरु यांच्या पादुका पूजन, सामाजिक उपक्रमा अंतर्गत ८१ सायकल गोरगरिबांना वाटप, प्रवचन, आरती सोहळा, उपासक दीक्षा, दर्शन, महाप्रसाद व पुष्पवृष्टीने कार्यक्रमाची सांगता होणार आहे, तरी या कार्यक्रमासाठी जिल्हाभरामधून तसेच



बीड तालुक्यातून हजारो भाविक या चरण पादुका दर्शन सोहळ्याचा लाभ घेणार आहेत तरी बीड तालुक्यातील शहरातील व बीड जिल्ह्यातील सर्व भक्त गणांना विनंती करण्यात येते की आपण या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित राहायचे आहे आणि गुरुमाऊलीच्या सिद्ध पादुकांचे दर्शन घेऊन हा कार्यक्रम पूर्ण पार पाडून आशीर्वाद घेवून जायचे आहे, असे बीड जिल्हा रामानंद संप्रदायाच्या वतीने सर्वांना आवाहन करण्यात आलेले आहे.

# सोयगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांची शिवजयंती साजरी

सावळदबारा ।प्रतिनिधी

सोयगाव तालुक्यातील सावळदबारा येथे छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी अल्पसंख्याक प्रदेशअध्यक्ष इद्रिस मुलतानी,प.स.सदस्य उत्तम चव्हाण,प. स. सदस्य. राहुल राठोड, भाजपाचे सोयगाव तालुका सरचिटणीस गुलाबराव पाटील कोलते,संभाजी पवार, गजानन गट, सुनिल शिपल्कर,संदिप आप्पा काळे, आजबराव चव्हाण, सखाराम कोते,अक्षय कोते,दिलीप टिकारे, रहिम पठाण,सदिप कोलते,आकाश गायकवाड, ज्ञानेश्वर वरखड,तुकाराम खिरडकर,शरीफ तडवी,भास्कर कोते, दगडू नरोटे,तुकाराम खिरडकर,समाधान कोते,प्रकाश गायकवाड, बालु खडके,ज्ञानेश्वर बोबडे,सुनिल बावणे,गणेश अगायते,प्रशांत क्यावल,महेश खडके, विशाल खडके, पवन कुळी,जीवन कुळी, भावेश टिकारे, प्रसाद टिकारे,आदी होते.



# श्री जी पी नगरकर निवासी मूक-बधिर विद्यालयात 'शिवजन्मोत्सव' उत्साहात; चिमुकल्या हातांनी केले रयतेच्या राजाचे पूजन!

देगलूर ।प्रतिनिधी

शब्दांची मर्यादा असली तरी मनातील अमाप ऊर्जा आणि शिवरायांप्रती असलेली अढळ श्रद्धा... याचा प्रत्यय आज देगलूरमध्ये आला. विकास शिक्षण संस्थेच्या श्री जी.पी. नगरकर निवास मूक-बधिर विद्यालयात महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९६ वी जयंती अत्यंत दिमाखात साजरी करण्यात आली.

चिमुकल्या शिवभक्तांच्या हस्ते पूजन

कार्यक्रमाची सुरुवात अत्यंत भावपूर्ण वातावरणात झाली. शाळेचे मुख्याध्यापक ए.व्हि. सरसंबे सर आणि विद्यालयातील चिमुकल्या मूक-बधिर विद्यार्थ्यांच्या कोमल हातांनी शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. आपल्या लाडक्या राजाला वंदन करताना या चिमुकल्यांच्या डोळ्यातील चमक सर्वांचे लक्ष वेधून घेत होती.

विचारांचे सोने लुटले.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान मुख्याध्यापक ए.व्हि. सरसंबे सर यांनी भूषवले. वा उ तज्ञ बी.एम. साखरे यांनी आपल्या प्रास्ताविकातून शिवरायांच्या जाज्वल्य इतिहासाला उजाळा दिला, तर शाळेचे विशेष शिक्षक डी. एस. येंडे सर यांनी शिवविचारांची आजच्या काळातील गरज यावर मार्मिक मनोगत व्यक्त केले. संपूर्ण कार्यक्रमाचे बहारदार सांकेतिक भाषेसह सूत्रसंचालन मारोती कुडकेवार यांनी केले.

यावेळी या उत्साह सोहळ्याला उपस्थिती श्रीमती गंगाबाई मरखले, वसंत पवार, विलास कोकणे, मारुती कुडकेवार, निर्मला बोधणें , सविता पेडेवार यांसह शाळेतील सर्व शिक्षक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मूक-बधिर बाल शिवभक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे या कार्यक्रमाला एक वेगळीच उंची प्राप्त झाली.छत्रपती शिवाजी महाराज की जय च्या जयघोषाने आणि विद्यार्थ्यांच्या उत्साहाने संपूर्ण शाळा परिसर शिवमय झाला होता.

## मूक पाखरांच्या भावविश्वात शिवरायांचा जागर; ३९६ व्या जयंतीनिमित्त देगलूरमध्ये भक्तिमय वातावरण



# सतीश वाघमारे यांना एम.सी.जे पदवी प्रदान

मुखेड ।प्रतिनिधी

पत्रकारिता क्षेत्रातील महत्त्वपूर्ण मानला जाणारा बीए एम सी जे ( मास कम्युनिकेशन अँड जर्नलिझम) या परीक्षेत वाघमारे यांनी प्रथम श्रेणित यश संपादन प्राप्त केल्यामुळे वाघमारे यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे पदवी प्रदान करण्यात आले मुखेड तालुक्यातील बाराहाळी येथिल रहिवासी असलेले सतीश शेषेराव वाघमारे यांनी नांदेड येथे असलेल्या श्री गुरुगोविंद सिंघजी पत्रकारिता महाविद्यालयात ३ वर्ष पत्रकारिता क्षेत्रातील महत्वपुर्ण मनाला जाणारा (बी.ए,एम.सी.जे ) मास कम्युनीकेशन जर्नालिसम या व्यवसायभूमीक परीक्षेचा परिपूर्ण अध्ययन करून प्रथम श्रेणित यश संपादन केले आहे.

त्यामुळे स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातर्फे सतीश वाघमारे यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते एमसी जे पदवी प्रदान करण्यात आले. हा भव्यदिव्य पदवी वितरण सोहळा वार - शुक्रवार दि.२० फेब्रुवारी २६ रोजी नांदेड श्री गुरुगोविंद सिंग जी पत्रकारिता महाविद्यालय मालेगाव रोड, नांदेड येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष- प्रा. विकास



कदम, तर प्रमुख पाहुणे म्हणून स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. हुशार सिंग साबळे, डॉ. चंद्रकांत बाविस्कर, डॉ. शेखर घुंगरवार, डॉ. देवदत्त देशपांडे, विकास कदम,आदिजन विचार पिठावर उपस्थित होते. वाघमारे यांना चउग पदवी प्रदान करण्यात आल्यामुळे पत्रकार- दत्तात्रय तिपणे, केशव रापतवार नरसिंग अस्वले, उत्तम वाडीकर, साईनाथ कोडगिरे,मनोज बिरादार, सनमुख मठदेवरू, गणेश जाधव,अजित पवार, बाबुराव वाघमारे, विश्वनाथ अरण्य, नागनाथ ससाणे यांनी अभिनंदन केले आहे.

# तहसीलदार शेळके यांच्या हस्ते जिव्हाळा केंद्रात बेघरांना अनुदान मंजुरीपत्र वाटप

## वयोवृद्धांनी दिले भावनिक आशीर्वाद





बीड ।प्रतिनिधी

जिव्हाळा केंद्रामध्ये निराधार व निराश्रीत नागरिकांसाठी दिलासा देणारे मंजुरी आदेश वितरण कार्यक्रम अत्यंत आपुलकीच्या आणि भावनिक वातावरणात पार पडला . श्रावणबाळ योजना आणि संजय गांधी निराधार योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना अधिकृत मंजुरी आदेश प्रदान करण्यात आले . या कार्यक्रमामुळे अनेक वयोवृद्ध , दिव्यांग , निराधार आणि गरजू नागरिकांच्या जीवनात आर्थिक आधाराची नवी आशा निर्माण झाली .

जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या कनवाळू आणि लोकाभिमुख भूमिकेमुळे जिल्ह्यातील दुर्बल घटकांपर्यंत शासकीय योजना प्रभावीपणे पोहोचत आहेत . गरजूंपर्यंत शासनाचा हात पोहोचावा , या उद्देशाने त्यांनी सातत्याने प्रशासनाला संवेदनशीलतेने काम करण्याचे निर्देश दिले आहेत . अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी जिव्हाळा केंद्राच्या कार्यपद्धतीबाबत विशेष जिव्हाळा दाखवत जास्तीत जास्त करून दाखवण्याची भूमिका घेतली असून निराधार नागरिकांच्या अडचणींना प्राधान्य देण्याचा स्पष्ट संदेश दिला आहे .

निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी हे बेघर आणि निराधार घटकाविषयी विशेष आपुलकी व्यक्त करत त्यांना केवळ आर्थिक मदतच नव्हे तर सन्मानाने जगण्याची संधी मिळाली पाहिजे असे मत मांडत असतात . उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनीही गरीब आणि गरजू घटकांप्रती कनवाळू दृष्टिकोन ठेवत प्रशासनाने अधिक संवेदनशीलतेने काम करण्याची गरज अधोरेखित केली आहे .

समाजातील बेघर , अनाथ , अपत्यहीन , निराधार , निराश्रीत वृद्ध व्यक्तींसाठी जिव्हाळा शहरी बेघर निवारा केंद्र कार्यान्वित करण्यात आले असून हे केंद्र रेणुका माऊली सेवाभावी संस्था व नगर परिषद बीड यांच्या संयुक्त विद्यमाने चालविले जात आहे . या केंद्रामध्ये स्वतंत्र इमारत असून त्यामध्ये स्वयंपाक गृह , भोजन कक्ष , कोठीघर यांसह दोन मजली इमारतीत कार्यालय , स्नानगृहे व मुबलक प्रमाणात शौचालये उपलब्ध आहेत . याशिवाय मनोरंजन कक्ष , वैद्यकीय सेवा , वाचनालय , बाग-बगिचा तसेच संबंधित कर्मचाऱ्यांसाठी निवासाची सोय करण्यात आलेली आहे .

येथे प्रत्येक राहणाऱ्या बेघर व्यक्तीस झोपण्यासाठी पलंग , सतरंजी , गादी , उशी , बेडशीट , चादर , कपाट , ब्लँकेट यांची सुविधा देण्यात येते . तसेच ताट , वाटी , तांब्या , बादली यांसारख्या मूलभूत गरजांचीही व्यवस्था करण्यात आलेली आहे . रस्त्याच्या कडेला , बसस्थानक परिसरात , पुलाखाली किंवा अडचणीच्या ठिकाणी वास्तव्यास असलेल्या निराधार नागरिकांना या केंद्रात प्रवेश देण्यात येतो . त्यामुळे बेघरांना सुरक्षित निवारा मिळण्यास मदत होत आहे .

या कार्यक्रमात तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या हस्ते मदन मारोती जाधव , रघुनाथ वामन वाघमारे , मुमताज कटाळु शेख , रामकिसन महादेव पुरी , अरविंद दत्तात्रय राजकर , शिवाजी यशवंता शिंदे , बाली बारीक सारूक , रईसा मेहमुद पठाण , अनिल चंद्रकांत साळवे आणि सुशाला अशोक जाधव या लाभार्थ्यांना मंजुरी आदेश वितरित करण्यात आले . मंजुरी आदेश मिळाल्यानंतर लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि कृतज्ञतेचे भाव स्पष्ट दिसून आले .

कार्यक्रमादरम्यान जिव्हाळा केंद्रातील वयोवृद्ध आजी-आजोबांनी भावनिक वातावरणात तहसीलदार शेळके यांना मनःपूर्वक आशीर्वाद दिले . आम्हाला शासनाचा आधार मिळाला , आता जगण्याला आधार मिळाला अशा भावना व्यक्त करत काही वयोवृद्धांनी कृतज्ञता व्यक्त केली . याच वेळी जिव्हाळा केंद्रातील लाभार्थी वैजंता बाई जावळे यांनी विठ्ठलाचे मंत्रमुग्ध करणारे गीत सादर केले . त्यांच्या सुरेल आवाजाने संपूर्ण सभागृह भारावून गेले आणि उपस्थितांच्या डोळ्यांत पाणी आले . त्या क्षणी वातावरणात संवेदनशीलता आणि आपुलकीची भावना प्रकर्षाने जाणवली .

तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी आपल्या मनोगतात सांगितले , निराधार बांधवांची सेवा करण्याची संधी मिळणे हे माझे भाग्य आहे . शासनाच्या योजना योग्य पात्र व्यक्तींपर्यंत पोहोचणे हीच खरी प्रशासनाची जबाबदारी आहे . कुणीही वंचित राहू नये , हा आमचा प्रयत्न आहे . त्यांनी पुढे स्पष्ट केले की लाभार्थ्यांचे आधार कार्ड अद्ययावत करणे , मतदार नोंदणी पूर्ण करणे , उत्पन्न दाखले किंवा इतर आवश्यक कागदपत्रे तात्काळ उपलब्ध करून देण्यासाठी तहसील कार्यालय सज्ज आहे . कागदोपत्री अडचणींमुळे कोणाचाही लाभ अडू देणार नाही , गरज असेल तर विशेष शिबिर घेऊन सर्व कामे पूर्ण करू , असे आश्वासन त्यांनी दिले .

कार्यक्रमास नायब तहसीलदार अण्णा वंजारे , सुहास हजारे , प्रशांत सुपेकर , पोलिस उपनिरीक्षक राजाभाऊ गुळभिले , जिव्हाळा केंद्राचे संस्थापक अभिजीत वैद्य , राजू वंजारे, यश वंजारे, छाया सरोदे प्रोबेशनर अधिकारी श्री पवळ , मधुकर बीलगे , गणेश केकाण , अजय चव्हाण , अमोल बडगुजर , चंद्रकांत तोडकर , मंडळ अधिकारी अनिल तांदळे , तलाठी शब्बीर पठाण , सहायक महसूल अधिकारी हेमलता परचाके , महसूल सहायक वैशाली बहिरवाळ , ज्योती कापसे , महेंद्र राऊत , छाया सरवदे , दिनेश कोरडे , आकाश शेळके , कैलास गायकवाड , सतीश जाधव आणि जिव्हाळा केंद्र , तहसील कार्यालय व नगरपरिषद येथील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते .

या योजनांमुळे निराधार , वृद्ध , दिव्यांग आणि गरजू घटकांना आर्थिक सहाय्य मिळणार असून शासनाच्या सामाजिक बांधिलकीचे हे जिवंत उदाहरण ठरले आहे . जिथे माणुसकी , तिथे देव या म्हणीप्रमाणे प्रशासनाने दाखवलेली संवेदनशीलता आणि जिव्हाळा हा या कार्यक्रमाचा आत्मा ठरला . एकूणच जिव्हाळा केंद्रातील हा उपक्रम केवळ मंजुरी आदेशांचे वितरण नव्हता , तर आशेचा आणि आधाराचा उत्सव होता . तहसीलदार शेळके यांच्या विशेष प्रयत्नांमुळे आणि जिल्हा प्रशासनाच्या कनवाळू भूमिकेमुळे निराधार नागरिकांच्या आयुष्यात नवे समाधान फुलल्याची भावना सर्वांनी व्यक्त केली .

# रयत सामाजिक प्रतिष्ठान कडून डॉल्बीमुक्त पारंपारिक पद्धतीने शिवजयंती उत्सव साजरी



बीड ।प्रतिनिधी

छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने यंदाही डॉल्बीमुक्त, पारंपारिक आणि संस्कारक्षम पद्धतीने शिवजन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. प्रतिष्ठानचे आर.जी. माने यांच्या संकल्पनेतून हा उत्सव दरवर्षीप्रमाणे याही वर्षी पारंपारिक वाद्यांच्या गजरात आणि भक्तीमय वातावरणात पार पडला.

शिवजन्मोत्सवानिमित्त पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. लेझीम पथक, हलगी पथक व पारंपारिक वाद्यांच्या निनादात काढण्यात आलेल्या पालखीने परिसर शिवमय झाला होता. महिला-पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत शिवभक्तीचा जागर केला. विवेकानंद वस्तीगृहाचे रोहिदास रोहिटे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या लेझीम पथकाने सोहळ्याची शोभा अधिकच वाढवली.कार्यक्रमास हरे कृष्णा मंदिर येथील देशमुख प्रभुजी गोलोक प्रभुजी मा. नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे, ज्येष्ठ समाजसेवक सुशील खटोड, प्रमोद रामदासी, उदय देशमुख, गणेश माने, अशोक ढोले, खरसाडे, केदार आबा, राजू गवळी, श्रीकांत वळेकर, महादेव भोसले, संग्राम माने, सोनू कावरे, रुद्र माने यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. तसेच विवेकानंद वस्तीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत कार्यक्रम यशस्वी केला.

डॉल्बी संस्कृतीला फाटा देत पारंपारिक पद्धतीने साजरा करण्यात आलेला हा शिवजन्मोत्सव समाजाला संस्कार, शिस्त आणि परंपरेचे महत्त्व पटवून देणारा ठरला. छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर करत स्वराज्य, शौर्य आणि समाजएकतेचा संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला.उत्सवाच्या निमित्ताने शिवप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. रयत सामाजिक प्रतिष्ठानच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# उंद्री (प.दे.) येथे विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ नवीन नोंदणीकृत सदस्यांचा सत्कार मोठ्या उत्साहात संपन्न



मुखेड ।प्रतिनिधी

तालुक्यातील उंद्री (प.दे.) येथे गेली चार ते पाच वर्षांपासून नारायण सावकार दाचावार यांच्या घरी नित्य नियमितपणाने वारकरी संप्रदायातील महिला मंडळ संध्याकाळी ८ ते १० या दरम्यान हे दोन तास भजन गवळणीच्या माध्यमातून भाव भक्ती गीतामध्ये तल्लीन होत असतात. हे नित्य नियमितपणे आजपर्यंत चालू आहे या महिला भजनी मंडळाचे रूपांतर नारायण सावकार दाचावार यांनी विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी वारकरी मंडळ या नावाने धर्मदाय आयुक्तामधून नोंदणी करून घेतली आणि त्याचेच औचित्य साधून त्यांच्या नवीन तयार केलेल्या विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ वारकरी संप्रदायाच्या महिला सदस्यांचा सत्कार उंद्री (प.दे.) गावचे पोलिस पाटील सविता विजयकुमार वादे यांना आमंत्रित करून यांच्या उपस्थितीमध्ये कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमात विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळ नोंदणीकृत भजनी मंडळाचे अध्यक्षांना पोलिस पाटील यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला तसेच सदस्यांचा आणि इतर महिलांचा पोलीस पाटील सविता वादे यांच्या हस्ते यथोचित सत्कार करण्यात आला.महिला भजनी मंडळाच्या वतीने पण गावचे पोलीस पाटील सविता विजयकुमार वादे यांचाही या ठिकाणी यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या ठिकाणी पोलिस पाटील यांनी सर्व महिला भजनी मंडळींचे विशेष कौतुक केले आणि त्यांनी आपल्या मोजक्या शब्दात म्हटले की याच्या पुढे आपल्या गावातील विविध कार्यक्रमात थोर नेत्यांच्या जयंती आणि इतर सण उत्सवाच्या मिरवणुकीमध्ये आपला आपले विठ्ठल रुक्मिणी महिला भजनी मंडळाचा वारकरी संप्रदायाच्या माध्यमातून सक्रिय सहभाग असावा. असे यावेळी आवर्जून सांगितले.अशा पद्धतीने कार्यक्रम मोठ्या भक्ती भावात संपन्न झाला. शेवटी भजनाच्या माध्यमातून या सत्कार सोहळा कार्यक्रमाची सांगता झाली.

# राजा म्हणजे विश्वस्त ही संकल्पना शिवरायांनी अमलात आणली - धनंजय गुडसुरकर



देगलूर ।प्रतिनिधी

'राजा म्हणजे विश्वस्त असतो ही संकल्पना छत्रपती शिवाजी महाराजांनी अंमलात आणली, रयतेसाठी राज्य ही भावना शिवरायांची थोरवी सांगणारी आहे 'असे मत प्रसिद्ध साहित्यिक व वक्ते धनंजय गुडसूरकर यांनी केले. शिळवणी ता. देगलूर येथे सार्वजनिक शिवजयंती उत्सव समितीच्या वतीने आयोजित 'शिवराय समजून घेताना 'या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सेवानिवृत्त कृषिअधिकारी प्रतापराव देशमुख होते .

महाराष्ट्रातील प्रसिद्ध समीक्षक ऋषिकेश गंगाधरराव देशमुख यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले. छत्रपती शिवाजी महाराज हे सद्गुणांचा समुच्चय होते. त्यांच्यातला जिद्दी युद्धनीतीज्ञ,विधायक राजनीतिज्ञ, मुत्सद्दी,समाज नितीज्ञ व धुरंदर राजनितिज्ञ ही सारी रूपे पाहिली तर त्यांच्यातील थोरवी लक्षात येते. शिवरायांचा इतिहास पाहिला तर त्यांच्यातला नि:पक्षपातीपणा व इतरांमधले गुण शोधून त्यांना त्याप्रमाणे जबाबदाऱ्या देण्याची त्यांची भूमिका यातून निष्ठावान सहकाऱ्यांची फौज तयार झाली. उद्यमशीलता हे राजांची महत्त्वाचे वैशिष्ट्य राहिले, त्यातून त्यांच्या सहकाऱ्यांना सातत्याने प्रेरणा मिळत गेली. पराक्रमाचा आदर्श वर्तनातून घालून देणारे शिवाजी महाराज त्यामुळे कायमच आदर्श आहेत. आजच्या परिस्थितीत महाराजांची ही उद्यमशीलता प्रेरक असून त्यांच्या एका गुणाचा जरी अनुनय आम्हाला आज करता आला तर आपल्या पुढील अनेक प्रश्न सुटू शकतात असे मत गुडसूरकर यांनी पुढे बोलताना व्यक्त केले. जात, पंथ, वंश यांचा विचार न करता उत्तम माणसे लोकसेवेसाठी निवडली जातात तेव्हा लोक कल्याण साधले जाते,आधुनिक लोकशाहीमध्ये हे तत्व मान्य केले जाते शिवरायांनी चारशे वर्षांपूर्वी या तत्त्वाची अंमलबजावणी केली होती, यावरून त्यांच्या दूरदृष्टीपणाची कल्पना येते असे गुडसूरकर पुढे बोलताना म्हणाले. मला काय मिळणार? ही भावना आज प्रभावीपणे समोर येत असताना मी काय देऊ शकतो? अशी भावना असणारे मावळे शिवरायांनी निर्माण केले. स्वराज्याची खरी संपत्ती म्हणजे हे निष्ठावान मावळे होते. याच संपत्तीवर शिवरायांनी परकीय सत्तेचा पाडाव केला व रयतेला सुखाचे दिवस दाखवले असे सांगून शिवरायांच्या कार्याचा व व्यक्तिमत्त्वाचा आढावा घेतला.

शिळवणी येथे यावर्षी प्रथमच सार्वजनिक शिवजयंती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. शिवजयंती महोत्सवानिमित्त ग्राम स्वच्छता अभियान, मृदंग वादन स्पर्धा, मोफत आरोग्य तपासणी, कीर्तन, शिवपूजन शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप व महाप्रसादाचे आयोजन शिवशंभु प्रतिष्ठान व गावकऱ्यांच्या वतीने करण्यात आले होते. ह. भ. प. ज्ञानेश्वरी ताई सुरनर यांचे शिवचरित्रावर कीर्तन झाले. शिवजन्मोत्सवाच्या सोहळ्यासाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष कृष्णा देशमुख, उपाध्यक्ष विलास माने, सचिव ज्ञानेश्वर माने आणि शिळवणीच्या समस्त गावकरी मंडळींनी पुढाकार घेतला. ऋषिकेश देशमुख यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले .

## अनधिकृत बांधकामांवरील कारवाईबाबत महापालिका

# अधिकारी- कर्मचाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यशाळा संपन्न



पिंपरी चिंचवड / बद्रीनारायण घुगे

दि २० रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कायदा विभाग व अतिक्रमण विभागाच्या वतीने अनधिकृत बांधकामे व मिळकतींवर करण्यात येणाऱ्या कारवाईच्या अनुषंगाने महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विशेष प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

शहरातील अनधिकृत बांधकामे व मिळकतींवर प्रभावी आणि कायदेशीर पद्धतीने कारवाई करता यावी, यासाठी अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांच्या सूचनेनुसार ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. पिंपरी येथील मुख्यालयातील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृह येथे पार पडलेल्या या कार्यशाळेत क्षेत्रीय अधिकारी, कार्यकारी अभियंता, कनिष्ठ अभियंता, बीट निरीक्षक तसेच इतर संबंधित कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यशाळेदरम्यान अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर, उपायुक्त राजेश आगळे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी महापालिकेचे विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# शहरातील लेंडी रोडवर पाण्याच्या गाड्यांचा कब्जा, प्रशासनाचे दुर्लक्ष

बीड ।प्रतिनिधी

बीड शहरातील बार्शी रोड वरून एक रस्ता लेंडी रोड कडे जात आहे .त्या रस्त्यावर दोन्ही साईडने पाण्याच्या गाड्या वाल्यांनी कब्जा केलेला आहे. त्यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण होत आहे. तरी वाहतूक शाखेच्या अधिकाऱ्यांना तसेच कर्मचाऱ्यांनी याची तात्काळ दखल घ्यावी.व लेंडी रोड मोकळा करावा.

हा मार्ग शहरातील खूप मोठी भाजी मंडी ९कडे जात आहे. आणि या मंडित बाहेर राज्यातील गाड्या भाजीपाला तसेच खाद्यपदार्थ घेऊन येतात. पण त्यांना मंडी कडे जातानी खूप अडचणीला तोंड द्यावे लागत आहे. सध्या रोडचे काम असल्यामुळे वाहतुकीत जास्तच अडथळा निर्माण होत आहे.

या पाण्याच्या गाड्यामुळे त्यांना खूप त्रास सहन करावा लागत आहे. पाण्याच्या टँकर मुळे वाहतुकीस अडथळा होत आहे. तरी प्रशासनाला विनंती आहे. त्यांनी पाण्याच्या गाडया वाल्याचा बंदोबस्त करावा. हीच अपेक्षा नागरिकाची आपल्याकडे केली जात आहे.

# उद्या हरीश कुलकर्णी यांचे अंबाजोगाईत गायन

अंबाजोगाई ।प्रतिनिधी



येथील संगीत साधना मंचच्या वतीने शास्त्रीय संगीत साधक व रसिकांसाठी मासिक सभा उद्या रविवार २२ फेब्रुवारी ला होणार असून या सभेत लातुर येथील प्रख्यात गायक हरीश कुलकर्णी यांचे स्वतंत्र गायन होणार आहे. संवादिनीवर विश्वजित धाट हे तर जयप्रकाश हरिदास तबल्यावर साथसंगत करतील. बालगंधर्व संगीत महाविद्यालयाच्या वतीने स्नेहा शिनगारे व रूपेश जाधव यांना सर्वोत्तम पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. आदर्श वसाहत भागातील कपिल गणेश मंदीर येथे सायंकाळी सहा वाजता होणाऱ्या या मासिक संगीत सभेचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग अॅण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# टार्गेटचा आकडा ओलांडत

# ४४४ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रम

## सावळेश्वर ट्रॅक्टर्सचा दणदणीत पहिला वर्धापनदिन साजरा





आष्टी - (प्रतिनिधी) शून्यातून विश्व निर्माण करून उद्योग क्षेत्रात भक्कम स्थान निर्माण करणारे उद्योजक आयडॉल रमेश दादा आजबे पाटील यांच्या सावळेश्वर उद्योग समूहाच्या सावळेश्वर ट्रॅक्टर्सने अवघ्या एका वर्षात ४४४ स्वराज ट्रॅक्टर विक्रीचा विक्रम नोंदवत कंपनीच्या ठरवून दिलेल्या टार्गेटचा टप्पा दुप्पट ओलांडला आहे. पठ्याचा नादच करायचा नाय या जिद्दी वृत्तीने काम करत सावळेश्वर ट्रॅक्टर्सने वर्षभरात दमदार यश संपादन करत दुसऱ्या वर्षात दिमाखात पदार्पण केले. पहिल्या वर्धापनदिनानिमित्त केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

शेतकऱ्यांच्या जीवनात परिवर्तन घडवून आणण्याचा आणि त्यांचे जीवन समृद्ध करण्याचा ध्यास घेत रमेश दादा आजबे पाटील यांनी २०१६ पासून ट्रॅक्टर उद्योग क्षेत्रात पाऊल ठेवले. त्यानंतर १९ फेब्रुवारी रोजी शिवजयंतीच्या शुभमुहूर्तावर आष्टी शहरात धोंडे पेट्रोल पंपासमोर नगर रोड येथे सावळेश्वर ट्रॅक्टर्स या नावाने स्वराज कंपनीच्या भव्य ट्रॅक्टर शोरूमचा शुभारंभ करण्यात आला होता.

ट्रॅक्टर विक्री व्यवसायात कंपन्यांकडून डीलर्सना वार्षिक टार्गेट दिले जाते. हे टार्गेट पूर्ण न झाल्यास डीलरशिप रद्द करण्याचे प्रसंगही उद्भवतात. मात्र सावळेश्वर ट्रॅक्टर्सने या सर्व अडथळ्यांवर मात करत कंपनीने दिलेल्या उद्दिष्टाचा केवळ टप्पाच पार केला नाही, तर दुप्पट विक्री करून ४४४ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रमी आकडा गाठला. वर्षभर आकर्षक बंपर ऑफर, तात्काळ बुकिंगवर सवलत आणि तत्पर विक्रीनंतरची सेवा यामुळे ग्राहकांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिसाद दिला.

दणकट बांधणी, कमी खर्चात अधिक काम करण्याची क्षमता आणि विश्वासार्ह कामगिरी यामुळे स्वराज ट्रॅक्टरने आष्टी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या मनात विशेष स्थान निर्माण केले आहे. गावोगावी स्वराज ट्रॅक्टरची मागणी वाढत असून सावळेश्वर ट्रॅक्टर्सने शोरूम व कंपनीचे नाव सर्वदूर पोहोचवले आहे.

या विक्रमी यशामागे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांच्यासह स्टेट हेड गुप्ता साहेब, एरिया मॅनेजर गिरीश जाधव, टेरिटरी मॅनेजर चेतन मुंडे, ब्रांच मॅनेजर मुळे साहेब, मॅनेजर प्रकाश कदम, मॅनेजर राजू साबळे, अकाउंट प्रांजली उगले, सुजाता सायकड, आशा पवार, रिसेप्शनिस्ट रेणुका वैद्य, जयश्री सांगळे तसेच लखन आजबे, आकाश शेळके, जालिंदर भवर, सागर निकरड, श्रीकांत गोले, ऋषी गायकवाड, रणजीत मुंडे, नामदेव आजबे, रवींद्र खंडागळे, ओमकार सोले, अशोक खंडागळे, धीरज रोडे, सुरज गोलेकर, स्वप्निल बरकडे, नामदेव हराळ, इब्राहिम पठाण, हनुमान घरगीणे, विश्वकर्मा कुमार, पूजा साठे आदींच्या अथक परिश्रमांचा मोलाचा वाटा आहे. ग्राहकांना जलद व विश्वासार्ह सेवा देण्यावर भर दिल्यानेच हा विक्रमी टप्पा गाठता आला, असे मत व्यक्त करण्यात आले.

वर्धापनदिनानिमित्त सर्व कर्मचारी व हितचिंतकांच्या उपस्थितीत केक कापून आनंदोत्सव साजरा करण्यात आला. ग्राहक राजांनी दाखवलेल्या विश्वासाबद्दल संस्थापक अध्यक्ष रमेश दादा आजबे पाटील यांनी कृतज्ञता व्यक्त केली.

तुमच्या सहकार्यानेच आम्ही हे यश मिळवू शकलो आहोत - आमच्या शोरूमच्या वर्धापनदिनानिमित्त सर्व प्रिय ग्राहक व हितचिंतकांचे मनःपूर्वक आभार! तुमचा अमूल्य विश्वास आणि पाठिंबा हाच आमच्या यशाचा खरा आधार आहे. गेल्या वर्षभरात तुमच्या सेवेसाठी तत्पर राहून, तुमच्या सहकार्याच्या बळावरच आम्ही ४४४ ट्रॅक्टर विक्रीचा विक्रम गाठू शकलो. भविष्यातही उच्च दर्जाची सेवा, तत्पर प्रतिसाद आणि शेतकऱ्यांच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्यरत राहण्याचा आमचा निर्धार आहे. - रमेश दादा आजबे पाटील (सावळेश्वर ट्रॅक्टर्स, धोंडे पेट्रोल पंपासमोर, नगर रोड, आष्टी)



# दावरवाडीत छत्रपती शिवाजी महाराज जयंती साजरी..!

दावरवाडी /प्रतिनिधी

दावरवाडी येथील महाराष्ट्राचे आराध्य दैवत असलेले छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले व मोठ्या उत्साहात जयंती साजरी करण्यात आली १९ फेब्रुवारी म्हणजे आनंदाचा दीवस सकाळ पासूनच दावर वाडी येथील छत्रपती शिवाजी महाराज मैदान गजबजलेले होते प्रथम सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले व नंतर छत्रपती शिवाजी महाराज यांची आरती झाली त्या वेळी शिवजन्मोत्सव समितीचे सर्व अधिकारी पदाधिकारी हजर होते

तसेच सायंकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त गावा मध्ये मिरवणूक काढण्यात येते. व छत्रपती शिवाजी महाराज यांची पुन्हा सायंकाळी जयंतीची मिरवणूक वेळेस निर्वाचित जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांची आरती संपन्न झाली व लहान मुलांचे जयंतीनिमित्त बाजार मैदानात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या विषयावर भाषणं केली जातात

त्यावेळी उपस्थिती व छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव समितीचे अध्यक्ष डी.डी.जाधव उपाध्यक्ष कल्याणजी सरोदे उप अ.मुस्ताफाभाई पठाण जिल्हा परिषद सदस्य राजेंद्र वाघमोडे मा. सरपंच श्याम तांगडे समिती नियोजनचे अण्णासाहेब तांगडे गणेश जगताप शिव जयंतीसाठी चोख बंदोबस्त पाचोड पोलीस स्टेशनचे पो.नि.सा सचिन पंडित यांच्या आदेशानुसार बी.ज. अण्णासाहेब गव्हाणे पोनिसा बाराहते पो.केदारे पो.काळे व गावातील नागरिक व समितीच्या वतीने शिवजयंती उत्सव चांगला पार पडला

# मौजे बारसवाडा येथे शिवजयंती उत्साहात साजरी संपूर्ण परिसर शिवमय



अंबड /प्रतिनिधी

मौजे बारसवाडा येथे दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात भक्तिभावात आणि आनंदाच्या वातावरणात साजरी करण्यात आली. शिवप्रेमी नागरिक, युवक, महिला, विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवून शिवजयंतीला भव्य स्वरूप दिले.

सकाळी प्रतिमापूजन शिवरायांच्या विचारांवर भर

सकाळच्या सत्रात गावाचे माजी सरपंच किसन तात्या गायकवाड यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विधीवत पूजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. शुभम मिठे यांनी केले. यावेळी किसन तात्या गायकवाड यांनी शिवरायांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकत म्हणाले की

केवळ डीजे वाजवून शिवजयंती साजरी करणे पुरेसे नाही शिवरायांचे विचार तळागाळापर्यंत पोहोचले पाहिजेत.आजच्या तरुणांनी शिवरायांचा इतिहास अंगी बाळगावा असे प्रेरणादायी विचार व्यक्त केले.

संध्याकाळी प्रेरणादायी शिवव्याख्यान

संध्याकाळच्या सत्रात प्रसिद्ध शिवव्याख्याते सौरभ सर्वनकर यांनी शिवरायांच्या शौर्य स्वराज्य संकल्पना आणि राष्ट्रनिर्मितीतील योगदानावर अत्यंत उद्बोधक व प्रेरणादायी व्याख्यान दिले. त्यांच्या ओघवत्या शैलीने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

भव्य नागरी सत्कार

या प्रसंगी सामाजिक कार्यकर्ते करण भैया मिठे व शुभम मिठे यांच्या हस्ते शिवव्याख्याते सौरभ सर्वनकर यांचा भव्य नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमात ग्रामस्थांनी टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले.

ग्रामस्थांची मोठी उपस्थिती

कार्यक्रमास गावातील बालक, पालक, विद्यार्थी, माता-भगिनी तसेच शिवप्रेमी नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर शिवमय वातावरणात न्हाऊन निघाला होता.

आभार प्रदर्शन

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. शुभम मिठे यांनी उपस्थितांचे आभार मानले आणि शिवरायांच्या विचारांचा प्रचार व प्रसार करण्याचा संकल्प उपस्थितांनी घेतला.

# माझी मायसमान आजी-शेऊबाई ज्ञानोबा चौरे यांना भावपूर्ण श्रद्धांजली

गुरुवार (प्रतिनिधी)

दि. १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०.३० वाजता माझ्या आयुष्यातील एक आधारवड कायमचा निघून गेला. माझी मायसमान आजी, शेऊबाई ज्ञानोबा चौरे यांनी शांतपणे अखेरचा श्वास घेतला. योगायोग असा की त्या दिवशी वार गुरुवार आणि पवित्र शिवजयंतीचा दिवस होता. जणू काही शुभ मुहूर्त साधूनच त्यांनी या जगाचा निरोप घेतला.

माझ्या आजीचे पूर्ण नाव शेऊबाई ज्ञानोबा चौरे. त्या मूळच्या खंडाळा, ता. जि. बीड येथील होत्या. गावातील ज्येष्ठ मंडळी सांगतात की त्यांचे वय अंदाजे ११० वर्षांच्या आसपास होते. इतके प्रदीर्घ आयुष्य लाभणे हेच त्यांच्या पुण्याईचे आणि कष्टमय, संयमी जीवनाचे फलित म्हणावे लागेल.

माझे आजोबा ज्ञानोबा चौरे हे जुन्या पिढीतील मोठे व नावाजलेले किराणा दुकानदार होते. त्यांच्या नावाला गावात मान-सन्मान होता. आजोबांच्या जाण्यानंतरही त्यांच्या आठवणी गावकऱ्यांच्या मनात कायम आहेत. अशा सुसंस्कृत कुटुंबात माझ्या आजीने आयुष्यभर संसाराचा गाडा समर्थपणे ओढला.

माझ्या लहानपणी वडिलांची परिस्थिती हलाखीची होती. त्यामुळे इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतचे माझे प्राथमिक शिक्षण खंडाळा येथे आजी-आजोबांकडे राहूनच पूर्ण झाले. त्या काळात आजीने मला केवळ नातू म्हणून नाही, तर स्वतःच्या लेकरासारखे जपले. मला गुपचूप दुकानातून बिस्किटे,



गोळ्या आणून द्यायची. मी काही खोड्या केल्या तरी ती माझीच बाजू घ्यायची. मी लहानपणी खूप खोडकर होतो, पण आजोबांच्या मानामुळे आणि आजीच्या प्रेमामुळे माझ्यावर कोणी तक्रार करत नसे.

अगदी एवढेच नव्हे, तर अनेक वेळा ती स्वतःच्या मुलांना - माझ्या मामांना - न देता गोडधोड पदार्थ मला गुपचूप द्यायची. तिच्या त्या प्रेमळ स्वभावामुळे आणि जिव्हाळ्यामुळे मला बराच काळ तीच माझी खरी आई आहे असे वाटायचे. जोपर्यंत मला समज नव्हती, तोपर्यंत मी आजीलाच आई समजत होतो. इतके तिचे माझ्यावर प्रेम होते. म्हणूनच माझ्यासाठी ती फक्त आजी नव्हती, तर मायच होती.

गेल्या सहा महिन्यांपासून वयोमानानुसार ती थकली होती. थोडीशी आजारी होती. तिची उपजीविका जवळपास फक्त दुधावरच चालत होती. तरीही तिच्या चेहऱ्यावर शांतता आणि समाधान दिसायचे. आयुष्यभर कष्ट, प्रेम आणि संयमाने जगलेल्या त्या मातृमूर्तीने अखेर १९ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १०.३० वाजता या जगाचा निरोप घेतला.

दि. २० फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ११ वाजता खंडाळा, ता. जि. बीड येथे त्यांचा अंत्यविधी करण्यात आला. यावेळी नातेवाईक, ग्रामस्थ आणि परिचित मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांच्या डोळ्यांत अश्रू होते, कारण गावातील एक जिवंत इतिहास, एक प्रेमळ सावली आणि एक मायमाऊली कायमची निघून गेली होती.

आज माझ्या मनात तिच्या असंख्य आठवणी दाटून येतात. तिचे मायेचे हात, तिचा प्रेमळ आवाज, माझ्या बाजूने उभे राहणारी तिची ठाम भूमिका हे सर्व माझ्या आयुष्याचा अमूल्य ठेवा आहे. तिच्या प्रेमामुळेच माझ्या बालपणाला आधार मिळाला, आत्मविश्वास मिळाला आणि जगण्याची ताकद मिळाली. अशा या थोर, प्रदीर्घ आणि समाधानी आयुष्य लाभलेल्या माझ्या मायसमान आजी शेऊबाई ज्ञानोबा चौरे यांना माझी भावपूर्ण श्रद्धांजली. त्यांची माया, संस्कार आणि आशीर्वाद माझ्या आयुष्यात सदैव सोबत राहतील. त्यांच्या पवित्र स्मृतीस विनम्र अभिवादन.

**- राजेंद्र लाड (नातू)**
९४२३१७०८८५

# बीडसांगवी येथे शिवमहोत्सव उत्साहात; सांस्कृतिक कार्यक्रम व हरीकीर्तनाने वातावरण भक्तिमय

आष्टी - (प्रतिनिधी) आष्टी तालुक्यातील ग्रामीण भागातील गणगेवाडी, गुंडेवाडी, कणसेवाडी आणि बीडसांगवी येथील अठरापगड जातींच्या नागरिकांनी एकत्र येत शिवभक्तीचा जागर साजरा केला. छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त श्री छत्रपती शिवाजी महाराज चौकात भव्य शिवमहोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. सर्वसामान्य नागरिक, युवक-युवती व महिलांच्या मोठ्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.

यावेळी युवा नेते जयदत्त भैय्या धस यांनी अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. आपल्या मनोगतात त्यांनी शिवरायांच्या स्वराज्य संकल्पनेचे स्मरण करून युवकांनी त्यांच्या विचारांचे अनुकरण करावे, असे आवाहन केले.



कार्यक्रमास महादेव दरा संस्थानचे महंत ह.भ.प. कल्याण कोल्हे महाराज, ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज भवर, ह.भ.प. शरद लेकरवाळे महाराज, ह.भ.प. गोविंद पवार महाराज, ह.भ.प. जालिंदर नरवडे महाराज, ह.भ.प. बाबासाहेब नरवडे महाराज, ह.भ.प. श्रीहरी पुरी महाराज यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच बीडसांगवीच्या प्रथम नागरिक सौ. शितल नंदकिशोर करांडे, उपसरपंच सौ. छाया साळवे, सेवा सोसायटीचे चेअरमन सुभाष तात्या गणगे, युवा नेते नंदकिशोर करांडे, माजी सरपंच बबनराव करांडे, आ. सुरेश अण्णा धस यांचे स्वीय सहाय्यक विकास तात्या साळवे, माजी उपसरपंच रंजित ढोबळे, संदिप करांडे, सोमनाथ घुले, सदाशिव गणगे, माजी सरपंच माणिक नरवडे, बाबासाहेब शिंदे, जालिंधर देवकर, विजय डुकरे, कल्याण मोहरकर, माऊली चव्हाण, विठल जाधव, सतोष घुले, रफिक शेख, रियाज शेख, मारुती करडुळे, लहु करडुळे, पोपट करडुळे, कृष्णा पाणतावणे, गोकुळ नरवडे, संतोष नरवडे, ललेश नरवडे, भाऊसाहेब नरवडे, लहु करांडे, महादेव करांडे, महादेव घुले, संजय मोरे, सुदामा मोरे, कातीलाल दिवटे, लक्ष्मण दिवटे, गोरख ढोबळे, घनशाम नरवडे, तुषार काळे, अनिल सोनवणे, दिपक कासवा, रितेश पानतावणे, विकास पानतावणे, पपु ढोबळे, संजय डुकरे, अमोल करांडे, आरेफ सय्यद, संतोष गोरे, सौ. अलका विकास साळवे, राणी करांडे, शोभा करांडे व, सुदामती करांडे, मनिषा गोरे , जयश्री जाधव, सुरेखा पंडित, अश्विनी पांडुळे, माया वाव्हळ, अर्चना करांडे, मनिषा माळी, सुनिता दळवी, सुनिता जाधव, मनिषा देवकर, छाया पानतावणे, नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालयाचे शिक्षक वृंद, जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक वृंद, इंग्लिश स्कूल शाळेचे शिक्षक वृंद यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

सांस्कृतिक कार्यक्रमात नेताजी सुभाषचंद्र बोस विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा व इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते, नृत्य व नाट्यप्रयोग सादर करून उपस्थितांची मने जिंकली. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना उपस्थितांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. शिक्षकवृंदांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

दि. १८ रोजी रात्री ह.भ.प. धनाजी चव्हाण महाराज सातारकर यांचे हरीकीर्तन संपन्न झाले. कीर्तनातून शिवचरित्र, धर्मसंरक्षण व समाजप्रबोधनाचा संदेश देण्यात आला. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन वाडेकर सर यांनी केले, तर आभार प्रदर्शन गोकुळ नरवडे यांनी मानले. सर्वांच्या सहकार्यामुळे बीडसांगवी येथे शिवजयंती उत्सव भक्ती, एकता आणि सांस्कृतिक जल्लोषात संपन्न झाला.

# मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी




जाफराबाद :- प्रतिनिधी हरी भालके

जाफराबाद दि. १९ जाफराबाद येथील मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. जावळे उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व अभिवादन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी महाराजांच्या शौर्यगाथा, पराक्रम व स्वराज्य स्थापनेतील कार्य यावर प्रभावी मनोगत व्यक्त केले.

काव्य मुकेश भारद्वाज, श्रीजा वाटोरे, वैभवी जाधव, समृद्धी वाघ, श्रीविरा पांडे, अक्षया मुळे, धनश्री निबंकर, श्रीयश भापकर, दिव्यांका चव्हाण, प्राची वीरे, काव्या खांडेभराड आदी विद्यार्थिनींनी छत्रपती शिवाजी महाराजांविषयी आपले विचार मांडत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षक के. एस. गाढवे, वाय. आर. आदबने, ए. व्ही. काकडे, एम. ए. शहा, एस. एस. भुतेकर, सि. टी. दिवटे, एम. के. चिंचोले, आर. आर. टोम्पे मॅडम, एस. आर. संन्यास मॅडम, व्ही. एन. पंडित मॅडम, एस. पी. अक्कर मॅडम, पी. ए. छडीदार मॅडम, ए. एस. जावळे मॅडम तसेच एस. पी. पडोळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुनील भुतेकर यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी व शिक्षक यांची उपस्थित होते.

मुख्याध्यापक एस. एस. जावळे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना शिवचरित्रातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेम, शिस्त व परिश्रम या मूल्यांचा अंगीकार करण्याचे आवाहन केले.

# भवरवाडी जि.प.शाळेला जामखेडच्या नवीन मराठी विद्यालयाच्या शिक्षकांची प्रेरणादायी भेट

## विद्यार्थ्यांसह शिक्षकांचा अनोख्या पद्धतीने गौरव; अक्षर रांगोळी उपक्रमाची सर्वत्र दखल

आष्टी (प्रतिनिधी)

ग्रामीण भागातही गुणवत्तापूर्ण व नावीन्यपूर्ण शिक्षणाची उंची गाठता येते, याचे जिवंत उदाहरण ठरलेली आष्टी तालुक्यातील भवरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा पुन्हा एकदा चर्चेत आली आहे. मराठवाडा भूषण आमदार सुरेश धस यांच्या शैक्षणिक व्हिजनला साकार रूप देणारी ही शाळा तसेच पद्मश्री अच्युत पल्लव यांनी भेट दिलेली हीच शाळा आज ग्रामीण भागातील आदर्श व बोलकी शाळा म्हणून नावारूपास येत आहे. शाळेतील अक्षर रांगोळी या अभिनव संकल्पनेमुळे संपूर्ण परिसरात सृजनशीलतेचे वातावरण निर्माण झाले आहे. शाळेच्या फरशीवर व भिंतींवर उमटलेली मोत्यासारखी टोकदार, आकर्षक अक्षरे विद्यार्थ्यांच्या लेखनकौशल्याला धार लावत आहेत. वाचन-लेखनाची गोडी निर्माण करतानाच विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर भर देणारी ही पद्धत पाहून अनेकजण प्रभावित होत आहेत.

या प्रेरणादायी कार्याची दखल घेत जामखेड येथील नवीन मराठी प्राथमिक विद्यालयाच्या सर्व शिक्षकांनी भवरवाडी शाळेला विशेष भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेण्यात आला तसेच शिक्षकांच्या नावीन्यपूर्ण कार्याचा अनोख्या पद्धतीने विशेष भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला. ग्रामीण शाळेतील उपक्रमशीलता, शिस्तबद्ध वातावरण आणि विद्यार्थ्यांमध्ये दिसणारा आत्मविश्वास पाहून पाहुण्या शिक्षकांनी मुक्तकंठाने कौतुक केले. कार्यक्रमास सरपंच भरत भवर, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष संतोष भवर, उपाध्यक्ष संजय भवर, हनुमंत मोरे, महादेव बागल, आसराजी भवर, शिवाजी भवर, तुकाराम भवर, दादा महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते. शाळेचे मुख्याध्यापक सुनील काकडे, सहशिक्षक अनिल बेद्रे व सहशिक्षिका सानिका भवर यांनी अक्षर सुधारणा अभियान, पुस्तकज्ञानासोबत व्यवहारज्ञान देण्याची पद्धत आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाविषयी सविस्तर माहिती दिली.

लोकमान्य तरुण क्रीडा व सांस्कृतिक मंडळ, जामखेडचे राजेंद्र देशपांडे व कोषाध्यक्ष उमेश



देशमुख यांची विशेष उपस्थिती लाभली. नवीन मराठी प्राथमिक शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती मीना राळेभात यांच्यासह उपस्थित शिक्षकवृंदाने भवरवाडी शाळेच्या कार्यपद्धतीचे विशेष कौतुक करत, ग्रामीण भागात असूनही ही शाळा शहरातील शाळांनाही लाजवेल अशी गुणवत्ता, सृजनशीलता व संस्कार देत आहे, असे मत व्यक्त केले.

सरपंच भरत भवर यांची प्रत्यक्ष सहभागाची भूमिका- भवरवाडी शाळेच्या नव्या इमारतीच्या उभारणीत सरपंच भरत भवर यांनी केवळ प्रशासकीय भूमिका न निभावता स्वतः सिमेंटच्या गोण्या दुचाकीवरून बांधकामस्थळी नेऊन प्रत्यक्ष सहभाग नोंदवला. ग्रामस्थांना सोबत घेऊन युद्धपातळीवर सुरू असलेले शाळेचे बांधकाम हेच या यशामागील खरी ताकद असल्याचे ग्रामस्थ सांगतात.

अक्षर रांगोळीची राज्यभर चर्चा - सहशिक्षक अनिल बेद्रे यांनी जुन्या व साध्या इमारतीलाही सृजनशीलतेची झळाळी दिली आहे. फरशीवर काढलेली आकर्षक अक्षर रांगोळी शाळेला बोलकं रूप देते. इयत्ता पहिली ते पाचवीपर्यंतच्या ३२ विद्यार्थ्यांना अक्षर सुधारणा, पुस्तकज्ञान आणि व्यवहारज्ञान एकत्रितपणे देण्याचा उपक्रम प्रभावीपणे राबविला जात आहे. ही पद्धत पाहण्यासाठी राज्यभरातील शिक्षक, पालक व शैक्षणिक अभ्यासक येथे भेट देत आहेत. भवरवाडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा ही लोकनेत्यांचा दूरदृष्टीपूर्ण व्हिजन, शिक्षकांची तळमळ, ग्रामस्थांचा सक्रिय सहभाग, नावीन्य आणि गुणवत्ता यांचा सुंदर संगम ठरत आहे. बीड जिल्ह्यातील ही आगळीवेगळी शाळा ग्रामीण शिक्षण व्यवस्थेला नवी दिशा देणारी प्रेरणादायी ठरत आहे.



# मंठा येथे छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

मंठा । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे शिल्पकार आणि रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मंठा शहरात विविध कार्यक्रमांनी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. शहरातील छत्रपती संभाजी महाराज चौक येथे महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवर व शिवप्रेमींनी जय भवानी, जय शिवाजी च्या घोषणांनी परिसर दणाणून सोडला.

जयंतीनिमित्त शहरात सकाळी भव्य मोटरसायकल रॅली काढण्यात आली. तसेच विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. मोठ्या संख्येने उपस्थित राहिलेल्या शिवप्रेमींनी कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

या निमित्ताने युवकांमध्ये देशभक्ती, शौर्य आणि स्वराज्याचा संदेश जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला.



### कौतुक! ८ वर्षांच्या चिमुकल्या जारा शेखने ठेवला आयुष्यातील पहिला 'रोजा'; नातेवाईकांकडून जंगी सत्कार

परतूर प्रतिनिधी तारेख शेख

पवित्र रमजान महिन्याला सुरुवात झाली असून, मुस्लिम बांधवांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे. या भक्तीमय वातावरणात एका ८ वर्षांच्या चिमुकलीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे. जारा फयूम शेख या चिमुकलीने आपल्या वयाच्या अवघ्या आठव्या वर्षी आयुष्यातील पहिला 'रोजा' (उपवास)यशस्वीपणे पूर्ण केला आहे. जाराने कडक उन्हात आणि लहान वयात दाखवलेल्या या धार्मिक निष्ठेचे सर्वत्र कौतुक होत आहे. तिच्या या पहिल्या रोजाचे औचित्य साधून शेख परिवाराच्या वतीने जाराचा विशेष सत्कार करण्यात आला. यावेळी तिचे वडील फयूम शेख, मोठे काका वसीम शेख आणि इतर जवळच्या नातेवाईकांनी जाराचे अभिनंदन केले आणि तिला पुढील वाटचालीस आशीर्वाद दिले.

रमजानच्या महिन्यात पहाटेपासून ते सूर्यास्तापर्यंत अन्न-पाण्याशिवाय राहणे कठीण असते, मात्र जाराने जिद्दीने हा उपवास पूर्ण केला. तिच्या या यशाबद्दल परिसरातून आणि नातेवाईकांमधून तिच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वच जण जाराच्या या धार्मिक श्रद्धेची प्रशंसा करत आहेत.

# शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त 'गुरु गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार' राजीव चव्हाण यांना प्रदान

मंठा । प्रतिनिधी

मोरे पाटील परिवार व शिवसृष्टी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शिवजन्मोत्सव २०२६ निमित्त शिक्षण क्षेत्रात गुणवत्ता वाढीसाठी उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राजीव चव्हाण यांना यावर्षीचा 'गुरु गौरव आदर्श शिक्षक पुरस्कार' प्रदान करण्यात आला आहे. त्यांच्या शैक्षणिक योगदानाची दखल घेत हा सन्मान करण्यात आला आहे.

शैक्षणिक क्षेत्रात सातत्याने गुणवत्तावृद्धीसाठी प्रयत्नशील राहून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेत हा पुरस्कार प्रदान देण्यात आला आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगती साधली असून समाजात शिक्षणाबाबत सकारात्मक दृष्टिकोन निर्माण करण्यास त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे.

हा सन्मान सोहळा माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर




यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडला असून भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर, 'मावळा द बोर्ड गेम'चे संचालक अनिरुद्ध राजदेरकर, शिवसृष्टीचे अध्यक्ष बाबासाहेब पाटील मोरे, प्रा. सहदेव मोरे पाटील आणि डॉ. कल्याण मोरे पाटील यांच्यासह अनेक मान्यवरांच्या शुभहस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

मोरे पाटील परिवार व शिवसृष्टी यांच्या वतीने हा सन्मान सोहळा मोठ्या उत्साहात पार पाडला असून, समाजातील गुणवंतांचा गौरव करून शिक्षण क्षेत्राला प्रोत्साहन देण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य मानला जात आहे.

राजीव चव्हाण यांच्या या यशाबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत असून मोरे पाटील परिवार व शिवसृष्टीचे सर्वत्र मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येत आहेत.

# डॉ.स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनात स्वरांगिनी वर्षा एखंडे यांचा सुरेल जल्लोष

आष्टी - (प्रतिनिधी) मा. आ. भीमरावजी धोंडे साहेब यांच्या संकल्पनेतून मराठवाड्यातील सर्वांत मोठे ठरणारे डॉ. स्वामीनाथन राज्यस्तरीय कृषी प्रदर्शन यंदा भव्यदिव्य स्वरूपात पार पडत आहे. कृषी क्षेत्रातील नव्या तंत्रज्ञानाचा प्रसार, शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि ग्रामीण भागातील सांस्कृतिक परंपरेला चालना देण्याच्या उद्देशाने आयोजित या प्रदर्शनात विविध उपक्रमांची रेलचेल पाहायला मिळत आहे.

या प्रदर्शनाच्या तिसऱ्या वर्षात विशेष आकर्षण ठरणार आहे मी होणार सुपरस्टार - आवाज कुणाचा महाराष्ट्राचा फेम स्वरांगिनी वर्षा एखंडे यांचे शेतकरी व धमाल गीतांचे सादरीकरण. आपल्या मधुर आणि दमदार आवाजाने महाराष्ट्रातील रसिकांची मने जिंकलेल्या स्वरांगिनी वर्षा एखंडे या शनिवारी, दिनांक २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ठीक ७




वाजता उपस्थितांना सुरेल मेजवानी देणार आहेत.

कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना आधुनिक शेती पद्धती, पीक संरक्षण, सिंचन व्यवस्था, पशुपालन, कृषी प्रक्रिया उद्योग यांसारख्या विषयांवर तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळत आहे. विविध कृषी कंपन्यांचे स्टॉल, शासकीय विभागांची माहिती केंद्रे आणि नाविन्यपूर्ण उपकरणांचे प्रात्यक्षिके यामुळे प्रदर्शनाला राज्यभरातून मोठी उपस्थिती लाभत आहे.

सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या कष्टमय जीवनात आनंदाचे क्षण निर्माण करण्याचा आयोजकांचा प्रयत्न आहे. त्याचाच एक भाग म्हणून स्वरांगिनी वर्षा एखंडे यांचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला असून, त्यांच्या सादरीकरणामुळे उपस्थितांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण होणार आहे. शेतकरी गीतांसह लोकप्रिय मराठी गाण्यांची मैफल रंगणार असल्याने मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित राहतील, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे. कृषी आणि संस्कृतीचा संगम घडवून आणणाऱ्या या राज्यस्तरीय प्रदर्शनाला शेतकरी, युवक-युवती तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.




# विवेकानंद इंग्लिश स्कूलचे, क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर जाधव यांना राज्यस्तरीय सन्मान

**डॉ आशिष तिवारी/मंठा**

**विवेकानंद इंग्लिश स्कूल, केंधळी तालुका मंठा येथील क्रीडा शिक्षक ज्ञानेश्वर चिमाजी जाधव यांना उत्कृष्ट क्रीडा शिक्षक व पंच म्हणून राज्यस्तरावर सन्मानित करण्यात आले. त्यांच्या क्रीडा क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेत हा गौरव प्रदान करण्यात आला.**

पुणे येथे आयोजित विशेष समारंभात महाराष्ट्र राज्याच्या उप आयुक्त दीपा मुधोळ मॅडम तसेच सहायक आयुक्त शिंदे साहेब यांच्या हस्ते ज्ञानेश्वर जाधव यांचा शाल, सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन गौरव करण्यात आला.

ज्ञानेश्वर जाधव यांनी गेल्या अनेक वर्षांपासून शालेय स्तरावर विद्यार्थ्यांना विविध क्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण देत त्यांच्यात शिस्त, संघभावना आणि क्रीडाभावना रुजविण्याचे कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक विद्यार्थ्यांनी तालुका, जिल्हा व राज्यस्तरीय स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. तसेच त्यांनी विविध स्पर्धांमध्ये पंच म्हणूनही प्रामाणिक व निःपक्षपाती कामगिरी बजावली आहे.

या सन्मानामुळे शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षकवृंद, विद्यार्थी व ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले आहे. त्यांच्या या यशामुळे संस्थेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे.

ज्ञानेश्वर जाधव यांचा हा सन्मान क्रीडा क्षेत्रासाठी प्रेरणादायी ठरत असून भविष्यातही ते विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात उज्ज्वल कामगिरी करण्यासाठी मार्गदर्शन करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# भवरवाडी येथे २६ व्या वर्षी श्रीमद् भागवत कथा व हरिनाम सप्ताह

आष्टी - (प्रतिनिधी) जामखेड तालुक्यातील भवरवाडी येथील ज्ञानेश्वर सेवा संस्थानमध्ये आजपासून श्रीमद् भागवत कथा, तुळशी पूजा व अखंड हरिनाम सप्ताहास भक्तीमय वातावरणात प्रारंभ होत आहे. या वर्षी सप्ताहाचे २६ वे वर्ष असून ग्रामस्थ व भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण आहे.



सप्ताहाच्या निमित्ताने दररोज पहाटे काकडा भजन, तुळशी पूजा, हरिपाठ, हरिकीर्तन, हरिजागर तसेच विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी ४ ते ६ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. कांताताई सोनटक्के महाराज यांची सुश्राव्य श्रीमद् भागवत कथा रंगत असून भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

या भागवत कथेला ह.भ.प. महावीर घुले, ह.भ.प. गहिनीनाथ सोनटक्के, ह.भ.प. कु. ज्ञानेश्वरी दीदी, ह.भ.प. कु. वैष्णवी दीदी तसेच ह.भ.प. राधाताई दीदी यांची साथसंगत लाभणार आहे. त्यांच्या गायन व प्रवचनातून भक्तीभाव अधिक वृद्धिंगत होणार आहे.

सप्ताहात विविध कीर्तन कार्यक्रमांचेही आयोजन करण्यात आले आहे. गायनाचार्य ह.भ.प. ज्ञानेश्वरी दीदी सोनटक्के, विनोदाचार्य ह.भ.प. राधादीदी सोनटक्के, गायनाचार्य ह.भ.प. वैष्णवी दीदी सोनटक्के तसेच गायनाचार्य ह.भ.प. नारायण महाराज दौंड यांचे कीर्तन होणार आहे.

बुधवार दि. २५ फेब्रुवारी रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत भागवताचार्य ह.भ.प. कांताताई सोनटक्के महाराज यांचे काल्याचे कीर्तन संपन्न होणार आहे. तसेच दि. २५ फेब्रुवारी रोजी काल्याचे कीर्तन विशेष आकर्षण ठरणार आहे.

सप्ताहाच्या निमित्ताने महाप्रसादाची पंगत दत्तात्रय बामदळे, परमेश्वर सोनटक्के, दत्तात्रय रासकर व भरत भिसे यांच्या तर्फे आयोजित करण्यात आली आहे. या धार्मिक सोहळ्यामुळे भवरवाडी परिसरात सात्त्विक व भक्तीमय वातावरण निर्माण झाले असून भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# महाशिवरात्री निमित्त आयोजित रक्तदान शिबिराला भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## शेकडो दात्यांचे 'रक्तदान'

जाफ्राबाद :- प्रतिनिधी हरी भालके

जाफराबाद

महाशिवरात्री यात्रा महोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बोरगाव मठ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला. अध्यात्म आणि सामाजिक बांधिलकीची सांगड घालत, 'रक्तदान हेच श्रेष्ठ दान' हा संदेश या उपक्रमातून देण्यात आला.सकाळी ८ वाजल्यापासून सुरू झालेल्या या शिबिरात तरुणांपासून ते ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी हिरीरीने सहभाग नोंदवला.दरवर्षीप्रमाणे यंदाही बोरगाव मठ येथे महाशिवरात्रीचा उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत करण्यात आला. या धार्मिक उत्सवाचे औचित्य साधून समस्त गावकऱ्यांच्या वतीने बोरगाव मठ, बोरगाव बु., बोरी खु, बोरगाव वाडी गावातील ग्रामस्थांनी भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भगवान शिवशंकराच्या चरणी सेवा अर्पण करण्याच्या भावनेने सकाळपासूनच रक्तदात्यांनी शिबीर स्थळी गर्दी केली होती.गावातील आणि परिसरातील अनेक तरुणांनी प्रथमच रक्तदान करून आपला सामाजिक धर्म निभावला

लीलावती ब्लड सेंटर बुलढाणा आणि लोकमान्य ब्लड बँकयांच्या सहकार्याने हा शिबीर पार पडला.

यावेळी बोलताना आयोजकांनी सांगितले की, धार्मिक कार्यासोबतच समाजातील गरजू रुग्णांना रक्ताचा तुटवडा भासू नये, हाच या शिबिरामागचा मुख्य उद्देश होता. गावकऱ्यांनी दिलेला हा प्रतिसाद कौतुकास्पद असल्याचे मतआयोजकांनी व्यक्त केले. यावेळी लिलावती ब्लड सेंटरचे विशाल राऊत, गजानन घाडगे,संदीप माकोडे,जगन खंदाडे, सुनिल जाधव, वसंता फदाट, गणेश फदाट, देविदास फदाट,प्रमोद पैठने, विकास शिंदे, एकनाथ फदाट, स्वप्नील चव्हाण, राहुल फदाट, सुनील फदाट,हर्षल फदाट,आनंद वाहूळे,आकाश वाघ, दत्ता मुळे, योगेश घाटगे, तुषार फदाट,पवन जाधव,गोपाल जाधव,कृष्णा मुळे, गोपाल काकडे,दिपक घाडगे,विठ्ठल चव्हाण,,संदेश फदाट, समाधान फदाट, शुभम फदाट,परमेश्वर जाधव, दिपक खंदाडे,रवि फदाट, विठ्ठल मुळे यांच्यासह परिसरातील तरुणांचा उत्स्फूर्त प्रतिसाद होता.

जाफराबाद

महाशिवरात्री यात्रा महोत्सव आणि अखंड हरिनाम सप्ताह निमित्त बोरगाव मठ येथे आयोजित करण्यात आलेल्या भव्य रक्तदान शिबिराला नागरिकांचा आणि तरुणांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला.

# ‘हाक शांततेसाठी’ला राज्य शासनाचा यशवंतराव चव्हाण वाङ्मयीन सन्मान

## प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना ना.धो. ताम्हणकर बालवाङ्मय पुरस्कार जाहीर; विद्यापीठाच्या इतिहासातील मानाचा क्षण



नांदेड ।प्रतिनिधी

युद्ध, विध्वंस आणि अस्थिरतेच्या सावटाखाली असलेल्या जागतिक परिस्थितीत शांततेचा समर्थ आवाज ठरलेल्या ‘हाक शांततेसाठी’ या पुस्तकाला राज्य शासनाचा प्रतिष्ठेचा यशवंतराव चव्हाण वाङ्मयीन पुरस्कार जाहीर झाला आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख कवी, लेखक, समीक्षक व अनुवादक प्रा. डॉ. पृथ्वीराज तौर यांना बालवाङ्मय ना.धो. ताम्हणकर पुरस्कार जाहीर झाला आहे. रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप असून दि २७ रोजी नाशिक येथे आयोजित केल्या जाणाऱ्या विश्व मराठी संमेलनात हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

प्रा. डॉ. तौर यांच्या ३० हून अधिक साहित्यकृती प्रकाशित झाल्या आहेत. कविता, कथा, कादंबरी, वैचारिक लेखन, समीक्षा, अनुवाद अशा विविध साहित्यप्रकारांत त्यांनी उल्लेखनीय कार्य केले आहे.

विद्यापीठासाठी मानाचा तुरा:

भाषा, वाङ्मय व संस्कृती अभ्यास संकुलाच्या २६ वर्षांच्या इतिहासात विभागात कार्यरत असताना प्राध्यापकाला प्रथमच राज्य शासनाचा वाङ्मयीन पुरस्कार मिळाल्याने विद्यापीठाच्या शैक्षणिक व साहित्य क्षेत्रात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे.विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी प्रा. डॉ. तौर यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

ना.धो. ताम्हणकर यांच्या कादंबऱ्यांनी माझ्यावर बालवयात संस्कार केले आहेत. ताम्हणकर आणि साने गुरुजी हे माझे आवडते कादंबरीकार. तेव्हा आपल्या आवडत्या कादंबरीकराच्या नावाचा शासकीय पुरस्कार मिळणे याचा विशेष आनंद आहे. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने बालसाहित्याकडे विशेष लक्ष पुरवल्यामुळे बालसाहित्य नियमित लिहीत राहिलो. त्यामुळे विद्यापीठाविषयी मनात विशेष कृतज्ञता आहे.

पृथ्वीराज तौर

नांदेड महाराष्ट्र शासनाचा साहित्य पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल पद्मश्री डॉ. जब्बार पटेल यांच्या हस्ते प्रा.तौर यांचा सत्कार करण्यात आला.

# कंधार मध्ये शिवजयंती उत्साहात साजरी



कंधार (प्रतिनिधी)

शहरात गुरुवारी शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. जयंती निमित्त सायंकाळी पाच वाजता धूमधडाक्यात सजीव देखाव्यासह मिरवणूक काढण्यात आली. यात महिला मोठ्याप्रमाणात सहभागी झाल्या होत्या. भवानीनगर येथील बालाजी मंदिरातून सायंकाळी पाच वाजत वाजत गाजत छत्रपती शिवरायांचा अश्वारुढ पुतळयासह डिजे लावून मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आले त्यात रथ, घोडे, छत्री स्वार मिरवणुकीचे आकर्षण होते. जय भवानी - जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय, अशी घोषणाबाजी करण्यात आली. ढोलताशाच्या तालावर तरुणाई सोबत मिरवणुकीत विविध सामाजिक राजकीय पक्षातील पुढाऱ्यांनी ठेका धरला होता. तर अनेकांनी खिचडीचे वाटप करून रक्तदान केले. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांचा अभिषेक श्रीक्षेत्र उमरज येथील श्रीसंत नामदेव महाराज मठसंस्थानचे मठाधिपती महंत एकनाथ महाराज आणि बारूळ मठ संस्थांचे मटाधिपती यांच्या हस्ते करण्यात आला. दुपारी ४ वाजता भव्य मोटार सायकल रॅली शहरातून काढण्यात आली. संध्याकाळी बालाजी मंदिर येथून मिरवणुकीचे उद्घाटन आ.प्रताप पाटील चिखलीकर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी लोहा/कंधारचे आ.प्रताप पाटील चिखलीकर यांची उपस्थिती होती. समितीचे अध्यक्ष विनोद तोरणे, सचिव परमेश्वर पाटील जाधव,कार्यअध्यक्ष धनराज लुंगारे,उपाध्यक्ष महेंद्र कांबळे, माजी आमदार तथा शिंदेसेनेचे नेते शंकरअण्णा धोंडगे, माजी आमदार सुभाषराव साबणे,माजी जि.प.सदस्य डॉ.पुरुषोत्तम धोंडगे, बाबुराव केंद्रे (उमरगेकर),माजी जि.प.उपाध्यक्ष दिलीपदादा धोंडगे, लोकनियुक्त नगरीचे नगराध्यक्ष शहाजी नळगे, उपनगराध्यक्ष मन्नान चौधरीसह सर्व प्रभागातील आजी/माजी नगरसेवक,माजी जि.प. सदस्य बाबुराव गिरे,शिवराज धोंडगेयांच्यासह विविध पक्षांचे पदाधिकारी, कार्यकर्ते व बाळ गोपालासह महिलाची मोठ्यासंख्येने उपस्थिती होती.

यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.अश्विनी जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली कंधार पोलीस निरीक्षक चंद्रकांत जाधव यांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

# सिडको झोन अंतर्गत सर्व मस्जिद परिसरात नागरी सुविधा द्या - कॉंग्रेसची मागणी



नांदेड ।प्रतिनिधी

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर सिडको झोन अंतर्गत असलेल्या मनपा प्रभाग क्र. १९ व २० मधील सर्व पाच मस्जिद परिसरात नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याची मागणी सिडको ब्लॉक कॉंग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्या उपस्थितीत निवेदन देऊन करण्यात आली. यावेळी परिसरातील मस्जिदीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्वभूमीवर, मस्जिद परिसर स्वच्छ व प्रकाशमय असणे अपेक्षित आहे. मात्र पवित्र रमजान महिन्याला सुरवात होऊन देखील नागरी सुविधेच्या समस्याचे निवारण झाले नाही. दरम्यान सिडको झोन अंतर्गत येणाऱ्या प्रभाग क्र. १९ व मधील दोन व प्रभाग क्र. २० मधील तीन अशा पाच मस्जिदीच्या परिसरात स्वछतेसाठी दोनवेळा स्वछता कर्मचारी उपलब्ध करून देणे व प्रकाशासाठी फोकस लाईट बसविण्याची मागणी सिडको कॉंग्रेसच्या वतीने, सिडको झोन सहाय्यक आयुक्त यांच्याकडे शुक्रवार दि २० फेब्रुवारी रोजी करण्यात आली. यावेळी सिडको वाघाळा ब्लॉक कॉंग्रेस अध्यक्ष बापूसाहेब पाटील यांच्यासह लतीफ शेख, मोईन शेख लाठकर, नरोद्दीन शेख, युसुफ शेख, कलीम शेख, गौस शेख आदिजन उपस्थित होते.

# एज्युव्हिजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी




अर्धापूर (प्रतिनिधी)शहरातील नामांकित एज्युव्हीजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती निमित्त भाषण स्पर्धा,चित्रकला स्पर्धा अशाप्रकारे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते. विविध नाविन्यपूर्ण उपक्रम घेऊन चर्चेत राहणाऱ्या एज्युव्हीजन अँड न्यू इरा किड्स इंग्लिश स्कूलमध्ये शिवजयंती निमित्त शिवरायांच्या जीवन चरित्रावर आधारित भाषण स्पर्धेमध्ये रियांश पत्रे, विनायक शिवणकर, स्वरा सोनवणे, स्पर्शिका खरसकर, अद्विती कोपरे, सुहानी पवार, आरोही राऊत, समरजीत देशमुख, समर्थ गुडूप, अमित मेकाले, पुरब अंधारे,युवराज अंधारे,रिया अंधारे, वैदही राऊत, पुजा डक,समीक्षा देशमुख,मयुरी गाडेकर,गायत्री धुमाळ, श्रेया गिरी, आदी विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला होता.

रिया अंधारे या विद्यार्थिनीने शिवरायांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकून सर्व विद्यार्थ्यांचे मने जिंकली तर गायत्री धुमाळ या विद्यार्थिनीने देखील त्यांच्या शौर्याची गाथा विद्यार्थ्यासमोर तेवढ्याच प्रखरपणे मांडली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या वेशभूषेमध्ये गौरव जंगीलवाड या विद्यार्थ्याने सर्वांचे लक्ष वेधून घेतले तर माँ जिजाऊंच्या वेशभूषेमध्ये कु. मनस्वी कवडे, कु.श्रेया गिरी, कु. स्पर्शिका खरसकर, कु ग्रीशा गायकवाड विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ममता हट्टेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन तर आभार प्रदर्शन आशुतोष पुरी यांनी केले.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षिका रोहिणी शिंदे,कोमल डांगे, स्वाती कवडे,स्वाती पांचाळ,शिवरानी पत्रे,किरण क्षीरसागर,अलका धुमाळ,बी विजय कृष्णा,मनीषा सिंग,शांतून सिंग,दत्ता उपरे,विजय पवार,अर्चना रासवंते,कविता गाडेकर यांनी परिश्रम घेतले.कार्यक्रम यशस्वीरित्या घडून आणल्याबद्दल शाळेची संचालक प्रवीण रावते, एज्युव्हीजनच्या प्राचार्या प्रिया रावते, संस्थेच्या अध्यक्षा श्रीमती रेखाताई रावते,संस्थेचे उपाध्यक्ष अभिषेक गुरखेल यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# किनवट तालुक्यात दहावी बोर्ड परीक्षेला सुरुवात; ११ केंद्रांवर ३५२१ विद्यार्थी परीक्षेला

## कडक बंदोबस्त, सीसीटीव्ही व ऑनलाईन वेब कास्टिंगद्वारे कॉपीमुक्त परीक्षेची अंमलबजावणी



आमदार भिमराव केराम यांच्या विद्यार्थ्यांना समाज माध्यमाद्वारे शुभेच्छा..

किनवट ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (फेब्रुवारी/मार्च २०२६) अंतर्गत किनवट तालुक्यात आजपासून इयत्ता १० वीच्या बोर्ड परीक्षांना शिस्तबद्ध वातावरणात प्रारंभ झाला. विद्यार्थ्यांच्या शालेय जीवनातील पहिल्याच सार्वजनिक परीक्षेला सामोरे जाताना केंद्र परिसरात उत्साह व गांभीर्याचे वातावरण दिसून आले.

परिरक्षक कार्यालय सि.यु.११८ अंतर्गत किनवट तालुक्यात एकूण ९ परीक्षा केंद्रांवर २६५३ विद्यार्थी परीक्षेला बसले आहेत. केंद्रनिहाय माहिती पुढीलप्रमाणे केंद्र क्र. ५१८१ - सरस्वती विद्या मंदिर किनवट एकूण परीक्षार्थी - ४०० केंद्र संचालक - भारत हातमोडे, केंद्र क्र. ५१८२ - सुमितीबाई गर्ल्स माध्यमिक शाळा किनवट एकूण परीक्षार्थी - ३७५ केंद्र संचालक - संगीता इंद्रसिंग राठोड, केंद्र क्र. ५१८३ - महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालय गोकुंदा एकूण परीक्षार्थी - ३७५ केंद्र संचालक - मुनेश्वर मुकुंद परशराम, केंद्र क्र. ५१८५ - जि.प. हायस्कूल, बोधडी (बु.) एकूण परीक्षार्थी - ३०५ केंद्र संचालक -देशमुख डी. ई., केंद्र क्र. ५१८७ - सरस विद्यालय मांडवी

एकूण परीक्षार्थी - १४३ केंद्र संचालक - पडगीलवार रमेश किष्टना, केंद्र क्र. ५१८८ - शासकीय आश्रमशाळा, सारखणी एकूण परीक्षार्थी - ३७६ केंद्र संचालक - कुंभार नामदेव विठ्ठलराव, केंद्र क्र. ५१८९ - शासकीय आश्रमशाळा, उमरी (बा.) एकूण परीक्षार्थी - २८६, केंद्र संचालक : जाधव शिवाजी बाबू, केंद्र क्र. ५१९१ - जवाहेरुल उलूम उर्दू माध्यमिक शाळा, किनवट एकूण परीक्षार्थी - २३७, केंद्र संचालक : इसरार खान जफर खान, केंद्र क्र. ५१९२ - अशोक माध्यमिक विद्यालय, पळशी एकूण परीक्षार्थी - १५६, केंद्र संचालक - राऊलवार आर. जी. दरम्यान, किनवट तालुक्यातील केंद्र क्रमांक ५१९० - जिल्हा परिषद उच्च माध्यमिक विद्यालय इस्लापूर परिक्षार्थी संख्या - ४२२, व केंद्र क्रमांक ५१८६ शासकीय माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा जलधारा एकुण परिक्षार्थी - ४४६ सदर दोन्ही परीक्षा केंद्रे भौगोलिक दृष्टया हिमायतनगर तालुक्याजवळ असल्याने त्या केंद्रांना हिमायतनगर येथिल परिरक्षक कार्यालयस जोडण्यात आले आहे.

कॉपीमुक्त परीक्षेसाठी विशेष उपाययोजना मागील वर्षापासून प्रशासनाने कॉपीमुक्त परीक्षेसाठी विशेष प्रयत्न सुरू ठेवले असून यंदाही सर्व केंद्रांवर सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहेत. परीक्षेचे ऑनलाईन वेब कास्टिंग करण्यात येत असून जिल्हास्तरावरून थेट देखरेख ठेवली जात आहे. सकाळी १०.३० वाजल्यापासून विद्यार्थ्यांना परीक्षा केंद्रात प्रवेश देण्यात आला. त्यापूर्वी नियमांनुसार हॉलतिकीट तपासणी व ओळख पडताळणी करण्यात आली. केंद्र परिसरात पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला असून अनधिकृत व्यक्तींना प्रवेशबंदी करण्यात आली आहे. कोरोना काळात ऑनलाईन माध्यमातून सुमारे दोन वर्ष घरातुन मोबाईलव्दारे महत्वाच्या इयत्तांमध्ये शिक्षण घेतलेल्या विद्यार्थ्यांना प्रथमच बोर्डाची परीक्षेला सामोरे जावे लागत आहे. शिस्तबद्ध व पारदर्शक वातावरणात किनवट तालुक्यात दहावी बोर्ड परीक्षेला सुरुवात झाल्याचे चित्र आज पाहावयास मिळाले. तरी आमदार भिमराव केराम यांनी परिक्षार्थी विद्यार्थ्यांना समाज माध्यमाद्वारे शुभेच्छा प्रदान केल्या आहेत.



# छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिर; ५८ शिवभक्तांचे रक्तदान

मराठवाडा पॅथोलॉजी लॅब व मिनाई दूध डेअरीचा संयुक्त उपक्रम; महाप्रसादाचेही वाटप

किनवट ।प्रतिनिधी

छत्रपतींच्या विचारांना कृतीतून अभिवादन करण्याच्या उद्देशाने मराठवाडा पॅथोलॉजी लॅब व मिनाई दूध डेअरी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जपत अक्षय पावडे व सुनिल चव्हाण यांनी या उपक्रमाचे नियोजन केले.शिबिरास शहर व परिसरातील शिवभक्तांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. किनवट पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक गणेश कराड, उपनिरीक्षक सागर झाडे, पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, सुनिल अन्नमवार यांच्यासह अनेक युवकांनी व शिवभक्तांनी रक्तदान करून सामाजिक कार्यात सहभाग नोंदविला.या शिबिरात एकूण ५८ रक्तदात्यांनी रक्तदान केले. संकलित रक्ताची प्रक्रिया व साठवणूक आदिलाबाद येथील कलावती ब्लड बँक यांनी केली. आपत्कालीन परिस्थितीत गरजू रुग्णांना या रक्ताचा उपयोग होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. रक्तदान शिबिरानंतर उपस्थितांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. शिवजयंतीनिमित्त आयोजित या उपक्रमामुळे समाजात ऐक्य, बंधुभाव व सेवाभावाची भावना अधिक दृढ झाल्याचे मत मान्यवरांनी व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मराठवाडा पॅथोलॉजी लॅब व मिनाई दूध डेअरीचे पदाधिकारी, स्वयंसेवक व शिवभक्तांनी परिश्रम घेतले. समाजोपयोगी उपक्रमांमुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या आदर्शांचा जागर कायम ठेवण्याचा संकल्प आयोजकांनी व्यक्त केला.

# दक्षिण नांदेड सिडको हाडको सह ग्रामीण भागात शिवजन्मोत्सव उत्साहात संपन्न

## जयभवानी जय शिवाजी जयघोष

नांदेड ।प्रतिनिधी

दक्षिण नांदेड सह सिडको हडको परिसरासह ग्रामीण भागातील विविध गावांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सोहळ्या निमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करून उत्साहात साजरा केला व सार्वजनिक शिवजन्मोत्सव समितीच्या वतीने भव्य मिरवणूक आयोजन हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळा परिसरातून आ . बोंढारकर व लोकप्रतिनिधी, समिती,महिला युवक यांच्या उपस्थितीत ढोल ताशांच्या गजरात व जय भवानी जय शिवाजी, छत्रपती शिवाजी महाराज की जय लेझीम पथकाच्या सादरीकरणाने उत्साहात करण्यात आले, मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी सामाजिक संघटना , विविध प्रतिष्ठानचा व्यापाऱ्यांनी अन्नदान, पाणपोई व्यवस्था केली होती.

छत्रपती शिवाजी महाराज यांची दि १९ फेब्रुवारी रोजी ३९६ व्या जयंतीनिमित्त सिडको हाडको परिसरातील सार्वजनिक शिवजन्मोत्सव समिती मराठा सेवा संघ ,संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड यांच्या वतीने हडको येथील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या पासून मुख्य रस्त्यानी मिरवणूकीस सुरूवात झाली यावेळी आ. बोंढारकर, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत शिंदे, नवनिर्वाचित लोकप्रतिनिधी संजय पाटील घोगरे, वैजनाथ देशमुख, सदस्य प्र उदय देशमुख, सतिश बस्वदे,राजु लांडगे,माजी नगरसेविका सौ. ललिता शिंदे,डॉ.करूणा जमदाडे यांच्या सह डॉ.नरेश रायेवार, नांदेड विनय गिरडे,तुलजेश यादव,अक्षय रावत, साहेबराव मामीलवाड, संजय इंगेवाड,प्रा.मधुकर गायकवाड, महेश शिंदे, भगवान ताटे,सोपान पांडे,मयुर अंमिलकंठवार, ज्योती कदम,यांच्या सह जयंती मंडळ अध्यक्ष साहेबराव मोरे,दिपक भरकड,दिलीप कदम, साहेबराव गाढे, संदीप कदम यांच्या सह मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड पदाधिकारी व महिला, विविध राजकीय पक्षांच्ये व सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी मुख्य मिरवणूक मध्ये सिडको हडको परिसरातील प्राथमिक व माध्यमिक शाळा विध्यार्थीनी सहभाग नोंदविला, सदरील मुख्य मिरवणूक हडको, ज्ञानेश्वर नगर , अण्णाभाऊ साठे पुतळा, सिडको शिवाजी चौक मार्ग जिजाऊ सृष्टी येथे संपन्न झाली, मिरवणूक मार्गावर अनेक ठिकाणी शिवजयंती निमित्त शुभेच्छा फलक सह विविध प्रतिष्ठानचा वतीने अन्नदान पाणपोई व्यवस्था करण्यात आली.

ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीत असलेल्या वाघाळा, वसरणी, जुना कौठा, नवीन कौठा,असदवन, असरर्जन यासह गोपाळचावडी विष्णुपुरी, धनेगाव,वाजेगाव,बळीरामपुर, बाभुळगाव,तुप्पा ,गुडेंगाव,राहेगाव, मार्कंड, गावासह अनेक गावांत शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न झाला. पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक बाळासाहेब रोकडे सहाय्यक पोलीस निरीक्षक सचिन गढवे ,रेखा काळे, विजय कांबळे, उपनिरीक्षक, पोलीस अंमलदार होमगार्ड यांनी कडेकोट पोलीस बंदोबस्त ठेवला होता.